
श्री
# साईलीला
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक

श्री साईनाथ वाचनालय
श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.



द्वारकामाईत धुनीसमोर बसलेले श्री साईबाबा

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री
# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :
**श्री.क.हि.काकरे**
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )

**श्रीसाई वाक्सुधा**

वर्ष ६१ वे )    किंमत १ रुपया    ( अंक ३

जून १९८२

: कार्यालय :
साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनी : ४४३३६१

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

श्रवण करितां साईसच्चरित् ।
श्रोते वक्ते नित्यपूत ।
पाप पुण्याचा होई घात ।
नित्य मुक्त दोघेही ॥ ३२ ॥

भाग्यें आगळे ऐकतां श्रोत्र ।
भाग्यें आगळे वक्तयाचें वक्त्र ।
धन्य हें श्रीसाई स्तोत्र ।
अति पवित्र निजभक्तां ॥ ३३ ॥

होऊनियां शुद्धचित्त ।
सद्भावें जे परिसती चरित ।
तयाचें ते सकळ मनोरथ ।
होतील सुफलित सदैव ॥ ३४ ॥

परम भावार्थे आदरेसीं ।
ऐकती या सच्चरितासी ।
निजपद भक्ति अनायासीं ।
लाभे तयांसी अविलंबें ॥ ३५ ॥

भक्तिभावें साई चरण ।
सेवितां करितां साईस्मरण ।
होईना यथेच्छ इंद्रियाचरण ।
सहज भवतरण रोकडें ॥ ३६ ॥

—श्रीसाई सच्चरित अध्याय ४८ वा.

## ज्ञान कोणास मिळते ?

श्रद्धावान् लभते ज्ञानम् ।
तत्परः संयतेंद्रियः ॥
ज्ञानं लब्धा परां शांतिं ।
अचिरेणाधिगच्छति ॥

जो श्रद्धावान आहे, ज्याने इंद्रिये विषयां पासून ताब्यात ठेवली आहेत, जो आत्म-सुख मिळविण्यासाठी तत्पर आहे अशा मनुष्यास ज्ञान प्राप्त होते. ज्ञान प्राप्ती झाल्यावर उशीर न लागता त्यास परमशांती प्राप्त होते.

[ ज्ञान प्राप्तीसाठी जे 'संत' असतील त्यांना शरण जाण्याची आवश्यकता ]

— श्रीसाईराम

# अनुक्रमणिका जून १९८२


१) संपादकीय — स्तुती करावी परमेश्वराची
२) श्रीवासुदेवानंद सरस्वती —
३) आमचे भोजनगृह आणि भोजनव्यवस्था — सदानंद चेंदवणकर
४) माझी बाबांवरच दृढ श्रद्धा — श्रीमंत अनुबाई वहिनीसाहेब घोरपडे
५) शिरडीच्या प्रेमपंथावर — श्री. चकोर आजगावकर
६) मी माझ्या भक्तीचा अंकीत — प्रा. एच. बी. महाले
७) जज्ज साहेबांचा अद्भुत अनुभव — श्री. ग. वा. जोशी
८) तुमच्या माझ्यातील भिंत पाडून टाक — श्री. सुरेश सातपुते
९) श्रीदत्तगुरूंचे चोवीस गुरू — श्री. आल्हाद काबाडी
१०) दोन संत द्वय — श्री. मधुसूदन करंबेळकर
११) एका सत्य घटनेवर विचार मंथन — श्री. वसंत वामन प्रधान
१२) श्रीसाई व माधवनाथ महाराज — श्री. बबन धोंडू येरम
१३) बाबांनी दिलेली संकटाची सूचना — सौ. उषा पंडित
१४) हरवलेले जर्नल मिळाले — एक साईभक्त
१५) भारतातील श्रीसाई मंदिरे —
१६) श्रद्धांजली —
१७) श्रीसाई स्तवन सतक — कु. महेश्वरी गुरू गोदावरीमाताजी
१८) तुजसाठी श्रीसाई — सौ. शशिकला रेवणकर
१९) साईलीलेची महती — सौ. प्राची शहाणे
२०) काव्यातून शुभसंदेश — निलम शाम देसाई
२१) श्रीसाईनाथ दर्शन — श्री. वि. बा. तानवडे
२२) श्रीबाबांचा संदेश — श्री. कृ. भा. देशमुख
२३) शिरडी वृत्त — एप्रिल १९८२

# ॥ स्तुती करावी परमेश्वराची ॥

## ( श्रीबाबांची शिकवण )

स. न. वि. वि.

## संपादकीय

कोणालाही म्हणा तुम्ही किती चांगले आहात! की मग तो माणूस अगदी खूष! स्तुति कोणाला नको असते? प्रत्येकाला स्तुती पाहिजे असते. त्यावेळी गरीब श्रीमंत असा कधी प्रश्नच उद्भवत नाही. पण माणसानी माणसाची फक्त स्तुती केली तरच त्यांना एकमेकावि षयी प्रेमभावना वाटत असते! ह्या उलट निंदानालस्ती झाली की एकमेकाविषयी फक्त असूयाच वाटत राहते!

हे असं का? तर, आपण माणसं सामान्य स्तुतीप्रिय! निंदानालस्ती पचविण्याचे सामर्थ्य आपल्यात नाही, आणि असं सामर्थ्य नाही म्हणून आपण सामान्य! हे आपल्याला पचविता येत नाही. ह्याचाच अर्थ आपल्याला उपदेशाची आवश्यकता आहे! लोकांचे शब्द सोसायला संत व्हावं लागतं! श्रीसाईबाबा अशातलेच एक संत! ज्यांना चमत्काराची आवड, त्यांना ते चमत्कार करून दाखवीत. ज्यांना ब्रह्मज्ञानाची आवड त्यांना ते कसे वागल्याने मिळते त्याची समज देत. ज्यांना नामस्मरणाची आवड होती त्यांना ते कशा प्रकारांनी करावं ते समजावून सांगत! ज्यांना पोथ्यापुराणं वा कुराणं पढण्याची आवड त्यांना त्या कोणत्या प्रकारे वाचाव्यात अथवा पढाव्यात त्याची समज देत! थोडक्यात परमेश्वराची ज्या ज्या प्रकारे सेवा करता येईल–त्या प्रकारे ते सर्वांना करायला सांगत! नाही तर नुसत्या पोथ्यापुराणं वाचून वाचून राग न सोडणाऱ्या अथवा–निंदानालस्ती करणाऱ्या माणसात काय इशील? बाबांची शिकवण ही अशा प्रकारची होती का? तुम्ही नामस्मरण करा! मग अल्ला म्हणा अथवा राम म्हणा! परमेश्वर तुमच्या मनातला भाव ओळखतो! राम म्हटलं म्हणून तो तुम्हाला जवळ करील आणि रहिम म्हटल्यावर दूर लोटील असं मुळीच नव्हे!

बाबांचं म्हणणं– परमेश्वराला हाक मारण्यातली आर्तता तो जाणतो! त्याल जातीपातीचे बंधन नाही. परमेश्वर सर्वत्र सारखाच! परम भक्तीने साथ घालणाऱ्या भक्ताला बाबांनी प्रत्यक्ष विठ्ठलाचे दर्शन घडवलेले आहे. इतरांना बाबा दिसत असत वारकऱ्यालाच फक्त विठ्ठल दिसावेत? ह्याचा अर्थ ' भाव तैसा देव ' कोणी कोणा

अधिक उणे बोलले तर बाबा म्हणत, ' अरे माझ्या काळजाला जखम होते, आपण एकाच परमेश्वराची सारी लेकरं, मग कशाला एकमेकाना घालून पाडून बोलायचं ? '

आणि म्हणूनच अशी चांगली शिकवण देणारे बाबा सदैव स्मरा. शिकवण कशी द्यावी ही सुद्धा एक कला आहे. तुम्ही दुसऱ्याला उपदेश करता तेव्हा स्वतःत असलेल्या दुर्गुणाची दखल घेता का ? नाही ना ? मग ती घ्यायला पाहिजे. राजकारणी लोक प्रजेला ( जनतेला ) सांगतात, ' माथी भडकू देऊ नका. संप करू नका. आपला हट्ट चालवू नका. ' पण ते स्वतः जे करू नका म्हणून जनतेला सांगत सुटतात ते स्वतः करत असतात. आपले अतिरेकीपण ते कधी सोडायला तयार नसतात. मग त्यांना इतराना सांगण्याचा अधिकार कसा पोचतो ?

श्रीबाबांची कोणतीही गोष्ट वाचा. त्यात कोणत्याही गोष्टीचा गोषवारा घेतला तरी देखील आपल्या पुढाऱ्यांना पुष्कळसे शिकण्यासारखे आहे. बाबा नेहमी भक्तांच्या कल्याणासाठी झटत असत. म्हणत, ' मी तुम्हाला भरजरी शेला द्यायला निघालोय, पण तुमची चिंधीची हाव सुटत नाही. ' खरंच आहे बाबांचं म्हणणं ! त्यांना आपले भवितव्य ठाऊक असल्याने ते त्या दृष्टीने आपले हित करतात. पण आपल्याला भवितव्याची दृष्टीच नाही. तात्कालिक मोहाला बळी पडून आपणच आपले नुकसान करून घेत आहोत. उदा० आपण आपल्या मुलांना घाणेरड्या सिनेमाला घेऊन जातो, नी मग म्हणतो--अरे त्यातली संस्कृति घाणेरडी आहे. आपली मुलं त्याचे अनुकरण करतात. अरे पण तुम्ही स्वतःच अशा सिनेमावर बहिष्कार घाला. मग तुमच्या मुलाबाळांना अशा सिनेमाला पाठवूही नका नि तुम्हीपण जाऊ नका. आदर्श ठेवायचा असेल तर तो शिवाजीराजांचा ठेवा!

श्रीबाबांची शिकवण ही सदैव सन्मार्गाप्रत नेणारी शिकवण होती. परमेश्वराची शिकवण होती. त्यात नेहमी कल्याणच होणार ! अशा तऱ्हेच्या शिकवणुकीची आज नितांत गरज आहे. पण हल्लीची शिकवणूक अशी कुठे दिसतच नाही. साहजिक आहे शिकवणारेच जे काय शिकवायचं ते जाणूनबुजून जाणत नाहीत तर शिकणारे काय करणार ?

आणि अशाच वेळी जिकडे तिकडे पाहून वाटतं. परमेश्वरा आता तू तरी अवतार घे आणि हा हैदोस थांबव. केवळ ही गोष्ट परमेश्वरच करू शकेल. मूठभर लोकांना हळहळ वाटून त्यांचा आवाज उठणार नाही म्हणून हे साईप्रभो तुम्हीच आता अवतीर्ण व्हा !

# साप ! साप ! श्री साईबाबा प्रसन्न

पुष्कळवेळा असं होतं माणूस साप ! साप ! म्हणून साप नसताना उगीचच भुई धोपटीत राहतो. एकाला भुई धोपटताना पाहून इतरही भुई धोपटण्याला सुरवात करतात. पण आपण हे असं का करत आहोत हे त्यांचं त्यांनाच माहीत नसतं. तसाच काहीसा प्रकार मुंबईच्या "नव-शक्ति" वर्तमान पत्राचे संपादक श्री. बेहरे यांचे दि. २३ एप्रिल १९८२ च्या नवशक्तिच्या अंकात 'शिर्डी टुरिस्ट सेंटर नव्हे' हा अग्रलेख लिहिताना झालेला दिसतो. शिरडी येथील दिक्षीतवाड्याच्या ठिकाणी साईबाबा संस्थानचे कोर्ट रिसिव्हर पंचतारांकित हॉटेल बांधणार आहेत असा त्यांना साक्षात्कार (?) झालेला दिसतो. पंचतारांकित हॉटेल श्री साईबाबा संस्थानच्या वतीने बांधण्याचा विचार आणि तोही दिक्षीत वाड्याच्या वास्तूंच्या ठिकाणी, कधीही आमच्या डोक्याला स्पर्शला नव्हता व नाही. दिक्षीतवाड्याच्या ठिकाणी पंचतारांकित हॉटेल कर-ण्याचा विचार आम्हाला श्री. बेहरे यांच्या नवशक्तिमधील दि. २३ एप्रिल, १९८२ च्या अग्रलेखावरून प्रथम समजला. त्यांनी हा भक्तांच्या भावनावर आघात करणारा शोध कोठून आणि कसा लावला हेच आम्हाला समजत नाही. श्री. बेहरेंची री इतर असंतुष्टांनी ओढली. काहींनी तर व्यक्ति द्वेषाची मळमळ ओकून टाकली. श्री साईबाबा त्या सर्वांचे भले करोत हीच प्रार्थना माझ्यासारखा माणूस करणार.

शिरडी येथे श्री साईबाबा इंटरनॅशनल (खाजगी) हॉटेलच्या उभारणीचे काम चालू होते. तेव्हा त्याला आम्हीच हरकत घेतली होती कारण त्यात मांसाहार व परमीट रूमची तरतूद करण्यात आली होती. हे कदाचित श्री. बेहरेंना माहीत नसावे. त्याला विरोध करायला तथा-कथित साई भक्तांपैकी एकही पुढे आला नाही.

दिक्षीतवाड्याची एकूण जागा आहे फक्त ६ गुंठ्यांची. एवढ्याशा जागेत पंचतारांकित हॉटेलची उभारणी माझ्या मते अशक्यप्रायच आहे. पंचतारांकित हॉटेल म्हटले की, राहाण्याच्या खोल्या, जेवणाची वेग-वेगळी शाकाहारी व मांसाहारी सोय, रेस्टारंट इत्यादि शिवाय पोह-ण्याचा तलाव, कार पार्किंग, गार्डन ह्या सोई आवश्यक ठरतात. ह्या

सगळ्या सोयी ६ गुंठे जागेत उपलब्ध करून देणारा आर्किटेक्ट अजून तरी जन्माला आलेला नसावा असे आम्हास वाटते.

श्री साईबाबा संस्थानचा कारभार बॉम्बे सिटी सिव्हील कोर्टाने नेमलेल्या रिसिव्हरमार्फत पाहिला जातो. मोठमोठ्या खर्चाच्या योजना कोर्टाने मंजूरी दिल्याशिवाय राबविता येत नसतात. आम्ही दिक्षीत-वाड्याच्या ठिकाणी पंचतारांकित हॉटेल बांधण्याचा प्रस्ताव कोर्टापुढे कधीही मांडला नाही. तसा विचार देखील कधी आमच्या डोक्याला शिवला नाही. म्हणूनच मी म्हणतो की, नवशक्तिचे श्री. बेहरे यांनी उगीचच साप साप म्हणून जमीन धोपटली आणि इतरांनी आपण काय करत आहोत ह्याचे भान न ठेवता श्री. बेहरेंची ' री ' ओढली.

आता प्रश्न पडतो तो श्री. बेहेरेंनी दि. २३ एप्रिल १९८२ चा बिन-बुडाचा अग्रलेख " शिरडी टूरिस्ट सेंटर नव्हे " का लिहिला असावा. श्री. बेहेरे श्री साईभक्त असल्याचे आमच्या माहितीत नाही. त्यांनी शिर्डीला येऊन श्री साईबाबांचे दर्शन घेतल्याचे आमच्या ऐकिवात नाही. त्यांनी श्री साईबाबांच्या जीवनावर किंवा जीवनमूल्यावर कधी काही लिखाण केल्याचे आमचे पाहण्यात नाही. ते साई भक्त नाहीत असे मी तरी कसे सांगू. ते साईभक्त असतीलही. तसे ते असल्यास आनंदाची गोष्ट आहे. ते जर साईभक्त असतील तर त्यांनी इतर साईभक्तांच्या भावनाशी का खेळावे. कदाचित त्यांचा बोलाविता धनी अन्य कुणीतरी असेल. साईभक्तांनी तरी श्री. बेहरे यांच्या साप ! साप ! म्हणून उगी-चच भुई धोपटण्यावर विश्वास ठेवू नये व संस्थानच्या कारभाराविषयी निष्कारण गैरसमज पसरवू नये ही विनंती.

**क. हि. काकरे**
कोर्ट रिसिव्हर,
श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.

शिर्डी, दि. १३ मे १९८२

ताजा कलम : " नवशक्ति "त दि. २३-४-८२ रोजी प्रसिद्ध झालेल्या अग्रलेखाबाबत आम्ही संपादकांकडे दि. ५-५-८२ रोजी खुलासा पाठविला होता. तो त्यांनी दि. १३-५-८२ चे अंकात प्रसिद्ध

करून त्यावर पुन्हा "पुन्हा एकदा शिरडी संस्थान" या शीर्षकाखाली अग्रलेख लिहिला. तो आमचा वरील लेख तयार झाले नंतर आमचे वाचनात आला. आमचा खुलासा कोणत्या मुद्याला धरून आहे हे स्पष्ट केले नाही असा त्या अग्रलेखाचा सुरुवातीचा मतितार्थ आहे पण त्यातच पुढे "ही माहिती म्हणजे दिक्षीतवाड्याचे पंचतारांकित हॉटेल उभारणेसंबधीची आहे" असे त्यांनी म्हटलेले आहे व त्याबाबत श्री. दिक्षीत यांनी संस्थानला नोटीस दिलेली आहे असा पुरावा दिला आहे. परंतु दिक्षीतांचे पत्र आम्हाला आले आहे. त्या पत्रात या तथाकथित 'पंचतारांकित हॉटेल' संबधी काहीही मजकूर नाही हे येथे स्पष्ट करणे जरूर आहे. "केवळ माझेच म्हणणे खरे" या अट्टाहासाने हा दुसरा अग्रलेख लिहिलेला दिसतो. त्या बाबतीत आम्हास काहीच म्हणावयाचे नाही. फक्त "दिक्षीतवाड्याचे पंचतारांकित हॉटेलात संस्थानकडून रूपांतर करणेत येत आहे" हा जो पवित्रा घेऊन भक्तांच्या भावनांशी त्यांनी खेळ मांडला आहे तो खेळ त्यांनी खेळू नये असे आम्हास वाटते. श्री. वदिक्षीत यांचे पत्रात त्यांना रीतसर उत्तर दिले जाईल. त्या बाबींना वर्तमानपत्रात प्रसिध्दी देणेची आवश्यकता आहे असे वाटत नाही.

क. हि. काकरे
न्यायालयधारक,
श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.


**श्रीसाईलीला**

**पुढील अंक श्रीगुरुपौर्णिमा विशेषांक**
**१ जुलै १९८२ रोजी प्रकाशित होणार**

176

२२ जून रोजी येणाऱ्या पुण्यतिथीनिमित्य

# श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामी महाराज

● रत्नागिरी जिल्ह्यातील सावंतवाडी या राजधानीच्या शहरापासून नऊ मैलावर असलेल्या माणगाव या सह्याद्रीच्या खोऱ्यातील एका लहानशा गावी इ. स. १८५४ मध्ये एका सत्वशील ब्राह्मण कुटुंबात श्री महाराजांचा जन्म झाला. श्रीमहाराजांचे तीर्थरूप गणेशपंत टेंबे आपल्या बालपणापासूनच विरक्त वृत्तीचे होते. अपस्माराचा विकार त्यांना होता. नित्य देवधर्मातच ते निमग्न असत. पुढे तर एकदा श्रीदत्तसेवेसाठी बारा वर्षे ते गाणगापुरातच जाऊन राहिले. बारा वर्षानंतर श्रीदत्तमहाराजानी त्यांच्यावर कृपाप्रसाद करून घरी कोकणात जाण्याची आज्ञा केली. त्या आज्ञेनुसार ते घरी परत आले. त्यानंतर काही दिवसातच तीन कन्याच्या पाठीवर त्यांना हा पुत्र झाला. त्याचे नाव त्याच्या वृद्ध आजोबानी म्हणजे हरिभट्ट टेंबे यांनी वासुदेव असे ठेवले.

श्रीमहाराजांच्या मातोश्रीचे नाव रमाबाई असे होते. त्या व्यवहारकुशल परमसाध्वी होत्या. श्रीमहाराजांच्या वेळी गर्भारपणी त्यांना अनेक दिव्य स्वप्ने पडत त्यामुळे कोणी अवतारी पुरुष आपल्या पोटी येणार याची त्यांना कल्पना होती.

श्रीमहाराजांच्या घरातील आचार अत्यंत पवित्र असे स्नान, संध्या, ब्रह्मयज्ञ, वैश्वदेव, पोथी, अतिथीसेवा, गोसेवा हा नित्यांचा आचारधर्म असे. श्रीमहाराजही मौजीबंधनानंतर हा आचार शुचिर्भूतपणे पाळू लागले. त्यामुळे बालवयातच ते अत्यंत तेजस्वी बटू दिसू लागले.

मौजीबंधनानंतर श्रीमहाराज तात्याभट्ट उकिडवे यांच्याकडे पहाटे तीन वाजताच उठून, स्नान करून अध्ययनासाठी सोवळ्याने जात. वाटेत कोठे पायास एखादी चिंधी लागली तर पुन्हा घरी येत, स्नान करीत, मग जात. यामुळे उकिडवे गुरुजींची त्यांच्यावर मर्जी बसली. आपल्याजवळ असलेली सर्व विद्या या निष्ठावान, परम गुरूभक्त शिष्याला त्यांनी मुक्तहस्ते दिली.

उकिडवे गुरूजींकडील अध्ययन संपल्यानंतर श्रीमहाराज गावातील शंभुशास्त्री साधले यांच्याकडे अध्ययनासाठी जाऊ लागले. तेथे संस्कृत काव्य आणि ज्योतिषशास्त्र यांचा अभ्यास सुरू झाला. परंतु काही दिवसातच या तैलबुद्धी शिष्याबद्दल

मनात काही विकल्प निर्माण होऊन शंभुशास्त्रींनी श्रीमहाराजांना आपले घर कायमचे बंद केले.

श्रीमहाराजांचे अध्ययन काय ते एवढेच. सावंतवाडीचे विष्णुभट्ट आळवणी आणि गोव्यातील नीळभट्ट पद्ये यांनी मधूनमधून जे शंकानिरसन केले त्यापलीकडे त्यांना अध्ययनाची संधी लाभली नाही. तथापि त्यांनी जे ग्रंथलेखन केले आणि सकल वैदिक ग्रंथातील पारंगतता पुढे प्रगट केली ती पाहाता ज्ञानाबाबत त्यांच्यावर ईश्वरी कृपाप्रसाद झाला असेच म्हणावे लागते.

श्रीमहाराजांचा विवाह त्यांच्या वयाच्या एकविसाव्या वर्षी त्यांच्या इच्छेविरुद्ध झाला. उपजीविकेसाठी त्यांनी आपले आजोबा हरिभट्ट टेंबे यांच्या पावलावर पाऊल ठेवून अत्यंत निरपेक्षपणे, कर्तव्यभावनेने भिक्षुकी केली. पण परान्न कधीही घेतले नाही. येऊ नये त्याचा शब्द कानावर आला की, समोरील अन्नाचे भरलेले पान लगेच तसेच सोडले ! यामुळेच श्रीमहाराजांना मंत्रसिद्धी लाभली असेल.

एवढे असले तरी श्रीमहाराजांना प्रपंचात अल्पही स्वास्थ्य नव्हते अठराविश्वे दारिद्र्य, घरामधील सासूसुनेचे नित्याचे भांडण, मोठ्या कुटुंबाच्या वाढत्या जबाबदाऱ्या यामुळे श्रीमहाराजांचे मन अशांतीने इतके व्यथित झाले की रात्ररात्रभर जंगलात नदीतीरावर जाऊन बसू लागले. संन्यास घेण्याची भाषा बोलू लागले.

भंगलेल्या मनःशांतीवरील उपाय म्हणून वयाच्या एकविसाव्या वर्षी श्रीमहाराज श्रीनरसोबावाडी या घाटावरील दत्तक्षेत्री आले. तेथे श्रीगोविंदस्वामींसारख्या अलौकिक सिद्धपुरुषाचा सहवास, श्रीगुरूचरित्राची पारायणे आणि सिद्धभूमीतील वास्तव्य या तीन गोष्टीमुळे मुळातच असलेल्या वैराग्याला उजाळा मिळून त्यांचे जीवन अमूलाग्र-बदलण्याच्या मार्गावर येऊन ठेपले.

उत्तम पूर्वसंस्कार, धगधगीत वैराग्य, पक्व झालेली प्रज्ञा आणि या सर्वांहून अलौकिक अशी श्रीदत्ताकृपा यामुळे श्रीमहाराज प्रापंचिक असूनही हळूहळू श्रेष्ठ प्रतीचे संत झाले. इतके की, साक्षात श्रीदत्त त्यांच्या माणगावी येऊन सात वर्षे राहिले.

साधकावस्थेत असताना श्रीमहाराजांना सिध्दीची प्राप्ती झाली. पण सिध्दीकडे त्यांनी ढुंकूनही पाहिले नाही. सावंतवाडीकर राजानी राजवाड्यात येण्याचे निमंत्रण केले पण राजवाड्यात त्यांनी पाऊलही ठेवले नाही. राजघराण्यातील एक स्त्री पिशाच-

पीडित होऊन माणगाव येथील श्रीमहाराजांनी स्थापन केलेल्या दत्तमंदिरी आली, तर त्यांनी तिला इतर शेकडो सामान्य भक्तांप्रमाणे वागविले.

श्रीमहाराजांनी आपले सर्व जीवित श्रीदत्तमहाराजांच्या आदेशानुसार व्यतित केले. आद्य श्रीशंकराचार्यांप्रमाणेच आमरण पायी संचार करून, हजारो दुःखीतांना दुःखमुक्त करून, शाश्वत सुखाच्या स्वधर्ममार्गी लावले. म्हणूनच श्रीमहाराजांना कृतज्ञ-भावाने दंडवत घालताना त्यांच्याविषयी प्रत्येकाच्या अंतःकरणातून खालील उद्‌गार बाहेर पडतील—

ज्यांनी सदाचारपूर्वक आजन्म अध्ययन केले; अल्पवयात वेदमंत्र सिद्ध होऊनही अध्ययन–अध्यापन–अनुष्ठान कधी सोडले नाही; मातेच्या आणि देवांच्या आज्ञेचे उल्लंघन ज्यांनी कधीही केले नाही; श्रींच्या सेवेकारणे नाही असा एक क्षणही ज्यांनी कधी दवडिला नाही. श्रींच्या दारी साचलेल्या पर्वतप्राय धनाकडे ज्यांनी कधी पाहिलेले नाही. उलट, शुक्लभिक्षेवर संतुष्ट राहून, नैवेद्य-वैश्वदेव करून ज्यांनी गृहस्थाश्रम चालविला. संन्यास घेऊन अखिल भरतखंडाचा संचार करून, दुःखार्तांची दुरिते नाहीशी करून, आपल्या कर्मज्ञान-भक्तीच्या योगे सद्‌धर्मांची गुढी दारोदार उभी केली. संस्कृताइतकेच मराठीवर प्रेम करून रामदास-तुकारामांचे बोल शिरोधार्य मानून संस्कृत आणि मराठी भाषेत गद्यपद्यात्मक विपुल विविध, भक्तिपर, तत्त्वज्ञानपर रचना करून जगन्नाथ-वामनांची स्मृति ताजी ठेवली. योग्यांना आर्त प्रापंचिकांना, श्रीगुरुंच्या प्रेमळ भक्ताना आपले अध्यात्मविचार सोप्या सुंदर अंतःकरणाला भिडणाऱ्या जिव्हाळ्याच्या भाषेमधून अमृताने भरल्या ओंजळीने पाजवून ज्यांनी तृप्त केले. सिध्दीची प्राप्ती होऊनही ज्यांनी त्यांच्याकडे कधी ढुंकूनही पाहिले नाही. उलट निर्धनातील निर्धनत्त्व आनंदाने पत्करून पूर्ण निःसंग होऊन, शरणागतांना नित्य दैवीसंपत्तीचा मार्ग दाखविला. कैवल्याच्या उतारपेठेकडे त्यांची चुकणारी पाऊले नित्य वळविली. स्वतःचे शरीरकष्ट पाहिले नाहीत की आमरण संचारातील अविश्रांत कष्ट जुमानले नाहीत. ते अनाथांचे नाथ, गुरूंचे श्रीगुरू वासुदेवानंदसरस्वती श्रीटेंबेस्वामी महाराज इ. स. १९१३ साली आत्मपदी, स्वानंदसुखी नर्मदातीरावरील श्रीगरूडेश्वर या स्थानी विलीन झाले.

संन्यासधर्माचा लोपलेला उज्ज्वल आदर्श श्रीवासुदेवानंदसरस्वतींनी महाराष्ट्रात आणि अखिल भारतात पुन्हा प्रस्थापित केला. दत्तसंप्रदायातील जी शुचिता आज महाराष्ट्रात घरोघरी दिसते तिचे मूळ या थोर पुरुषाने घालून दिलेल्या आचारधर्माच्या आदर्शात आहे.

卐

# आमचे भोजनगृह आणि भोजन व्यवस्था

—श्री. सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक श्रीसाईलीला
श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी

● श्रीसाईबाबा संस्थानच्या ध्येय-धोरणाप्रमाणे परगावाहून येणाऱ्या प्रत्येक साईभक्ताची सर्वतोपरीने सोय सुविधा करण्यास संस्थान सदैव कटीबद्ध आहे. विशेषतः निवासस्थानांच्या सोयीसाठी नेमलेले सर्वच कर्मचारी तर रात्रंदिवस जागे असतात. धार्मिक, शैक्षणिक, वैद्यकीय व गोरगरीबांना सहाय्य करणे या क्षेत्रातील संस्थानचे कार्य तर जगजाहीर आहे. शिरडी येथे येणाऱ्या सर्वच भक्तांची श्रीबाबांचे सर्व सोहाळे पहाण्याची, ते पुन्हा पुन्हा पहाण्याची, येथे मुक्काम करण्याची तसेच बाबांचा भोजन-प्रसाद खाण्याची उत्कट इच्छा असते. त्यासाठी आवश्यकतेप्रमाणे निवासस्थाने बांधण्याचे व भक्तांच्या भोजनाची व्यवस्था करण्याचे काम संस्थानने अंगीकृत केले आहे परंतु अनुभव असा की या दोन्ही बाबींसाठी वेळोवेळी केलेल्या सुखसोयी भक्तांच्या केवळ वाढत्या संख्येमुळे अपुऱ्याच पडत आहेत.

शिरडी येथे येणाऱ्या भक्तांना संस्थानतर्फे प्रसाद भोजन देण्याची सोय फार पूर्वीपासून प्रचलीत आहे. खुद्द बाबा असताना तर बाबा काही भक्तांना आपल्या सेवेकऱ्यांच्या घरी भोजनास पाठवून देत व तिथे त्या भक्ताची सोय होत असे. त्यावेळी भोजन करणारी मंडळी भोजन घालणाऱ्याच्या घरी मोबदला देत असत की नाही याची माहिती नाही. परंतु घेत देत नसावीत असे वाटते कारण त्याकाळी सगळीच स्वस्ताई होती.

श्रीबाबांच्या महानिर्वाणानंतर शिरडीस येणाऱ्या भक्तांसाठी प्रसाद भोजनाची सोय करण्यात येऊ लागली ती एका लहानशा खोलीत व त्यावेळी भोजन करणाऱ्यांची संख्याही कमी होती. त्यावेळी म्हणे भोजनाचा दर अवघा सहा आणे होता. परंतु दिवसेदिवस भक्तांची संख्या वाढू लागल्याने श्रीबाबांचे परमभक्त कै. हरी सीताराम दीक्षित यांनी बाबा हयात असतानाच १९१० साली जागा स्वतः विकत घेऊन त्यावर इमारत बांधली व पुढे ती श्रीसाईबाबा संस्थानच्या उपयोगासाठी दिली. गुरुस्थानासमोर असलेली ही इमारत दीक्षितवाडा या नावाने प्रसिद्ध आहे व या

इमारतीचा उपयोग भोजनगृह म्हणून होऊ लागला. पण पुढे ही इमारत पण अपुरी पडू लागली म्हणून १९५० साली या इमारतीस जोडूनच एक मोठे दालन बांधण्यात आले आणि येथेच ऑगस्ट १९८० पर्यंत प्रसादभोजनाची भक्तांची सोय होत होती. या हॉलमधे एकावेळी १६० भोजनाची ताटे वाढली जात असत. पण हा हॉल अपुरा पडू लागला. दररोज कमीत कमी दीड ते दोन हजार भक्त भोजन लाभ घेऊ लागले. गुरुवारी, रविवारी व इतर सुटीच्या दिवशी तर ही संख्या वाढू लागल्याने भक्तांना भोजनासाठी बराच वेळ रांगेत उन्हातान्हात उभे रहावे लागे. कित्येकाना तर वेळेच्या अभावी अगदी उत्कट इच्छा असूनही प्रसाद न घेताच निराशेने नाराजीने परत जावे लागे. सकाळची भोजने सकाळी ९ वा ९–३० ला सुरू करूनसुद्धा तीनतीन–चारचार वाजेपर्यंत ती चालत व पुन्हा लागलीच संध्याकाळी सातपासून रात्रीची भोजने सुरू होत यामुळे भोजनगृह व्यवस्थेवर खूपच ताण पडू लागला. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन नवीन भव्य वास्तू उभारण्याची कल्पना पुढे आली, व गणेशपुरीचे संत परमहंस श्रीस्वामी मुक्तानंदबाबा यांचे शुभहस्ते नव्या इमारतीचा भूमीपूजन व कोनशिला समारंभ १९–२–१९७८ रोजी करण्यात आला. त्यावेळी श्री. का. सी. पाठक हे न्यायालयधारक होते. भोजनगृहासाठी बांधण्यात आलेली ही नवी वास्तू टप्प्याटप्प्याने पूर्ण होत होत २५–८–८० रोजी तिचे उद्‌घाटन श्री. एन. के. पारेखसाहेब न्यायमूर्ती उच्च न्यायालय मुंबई यांचे शुभ हस्ते झाले. श्री. पाठकसाहेब हे या समारंभप्रसंगी अध्यक्ष म्हणून हजर होते.

भोजनगृहासाठी बांधलेली ही नवी इमारत लेंडीबागेतील साईनिवास या इमारतीच्या पलीकडे असलेल्या शिर्डी-पिंपळगाव रस्त्याच्या पलीकडे आहे. या भोजनगृहाचे नाव 'साईप्रसाद' हे योग्यच, सार्थ अशा अर्थांने ठेवलेले आहे.

'साईप्रसाद' भोजनगृह हे विशालतेच्या दृष्टीने महाराष्ट्रातील प्रथम क्रमांकाचे व भारतातील द्वितीय क्रमांकाचे ठरलेले आहे. या भोजनगृहाने २५००० चौरस फूटाचे क्षेत्र व्यापलेले आहे. फक्त भोजनगृहाचे दालन दहा हजार चौरस फूटाचे आहे. भोजनगृह बिनखांबी असून संपूर्ण महाराष्ट्रात असे हे एकमेव आहे. दिक्षितवाड्यातील भोजनगृहात टेबलखुर्चीवर एकावेळी १६० भोजन करणारे बसत तर या नव्या वास्तूत एकावेळी १९२ स्टेनलेस स्टीलचा पत्रा वरून ठोकलेल्या टेबल बाकावरून ९५० मंडळी भोजनास बसतात. उत्सवकाळात भारतीय बैठक जर मांडली तर एकावेळी पंगतीत १२०० लोक बसतात. या भोजनगृहात ५०×५० फूटाचे प्रतिक्षागृह आहे. भोजन दालनात जर जागा नसेल तर भोजन करणारी ४०० मंडळी क्रमवार येथे थांबू शकतात. त्यांना बसण्यासाठी कायम स्वरुपाचे नागमोडी कठडे व लगतच बसण्यासाठी बाके यांची सोय केलेली आहे. संतांच्या प्रतिमा प्रतिक्षागृहात

लावण्यात आल्या आहेत. या प्रतिक्षागृहाच्या शेजारीच भोजनाची तिकीटे मिळण्याची खिडकी आहे. सकाळी ९-३० व सायं. ६-३० पासून तिथे तिकीटे मिळतात. सध्या भोजनाचा माणसी दर २ रु. व मुलांना १ रु. आहे. प्रतिक्षागृहाला असलेल्या आतल्या दरवाजाने भोजनगृहात भोजनमंडळींना प्रवेश दिला जातो व तिथेच भोजन कूपनाचा अर्धा भाग फाडून घेऊन अर्धा भाग भोजनीकाचे हाती दिला जातो. भोजन मंडळींना एका वेळी स्टेनलेस स्टीलच्या ताटातून भोजन पदार्थ वाढले जात पण आता प्रत्येक पदार्थासाठी वेगवेगळी जागा एकत्रच असलेल्या स्टेनलेस स्टीलच्या प्लेटसमधून भोजन वाढले जाते. ही भोजनपात्रे मुंबईचे एक दानशूर साईभक्त श्री. गुप्ता यांनी ७५ हजार रु. किंमतीची एक हजार अशी पात्रे देणगी म्हणून दिली आहेत. भोजनगृहात पदार्थ वाढण्यासाठी म्हणून ढकलगाड्यांची ( ट्रॉली ) सोय केलेली आहे. त्यामुळे वाढप्यांची शक्ती व वेळ वाचतो व अल्प वेळात अनेकांना हवे असलेले पदार्थ भराभर वाढले जातात. भोजन ताटात पोळी, भात, आमटी, एखादी पातळ भाजी, उसळ किंवा दुसरी भाजी, लिंबू वा मिरचीचे लोणचे, मीठ व एक वाटी ताक मर्यादित असे पदार्थ वाढले जातात. तीन दिवसाचे उत्सव काळात तिन्ही दिवशी ताटात गोड पदार्थ असतात. पहिल्या दिवशी गोड शिरा, दुसरे दिवशी जिलेबी व तिसऱ्या दिवशी लाडू असे पदार्थही वाढले जातात. यावेळीही भोजनाचा दर माणसी दोन रुपयेच असतो. वांगी, डांगर, ढेमसे, कोबी, ओला वाटाणा, कांदाबटाटा, अळू, सुरण, टोमॅटो यांपैकी एखादी पातळ भाजी भोजनास असतेच असते. शेतकऱ्यांकडून त्या भाज्या दररोज योग्य दरात घेतल्या जातात. त्या साफसूफ केल्या जातात. व मगच त्यांचा उपयोग केला जातो.

भोजन गृहात स्वयंपाकाचे पदार्थ शिजविण्यासाठी गॅस व डिझेलच्या तसेच लाकूडफाट्याच्या जळणाऱ्या भट्या आहेत. डिझेलच्या दोन भट्या आहेत तर विजेच्या दोन भट्या आहेत पण त्या अजून सुरू झालेल्या नाहीत. ताक करण्याचे यंत्र पण आहे. २० लिटर दह्याचे ६०-७० लिटर ताक अवघ्या १५ मिनिटात तयार होते. बटाट्यावरील साली सोलण्याच्या यंत्राने तर काही सेकंदातच ५ किलो बटाट्याच्या साली काढल्या जातात. चटणी तयार करण्याच्या यंत्राने तर १५ मिनिटात १०-२० किलो उत्तम चटणी तयार होऊन मिळते. चपाती यंत्राने तर १ मिनिटात २० चपात्या होतात.

भोजनगृहाची सकाळची वेळ १०-३० ते दुपारी २ व सायंकाळी ७-३० ते रात्री ९ पर्यंत अशी आहे. या भोजन गृहात रोजची ४००० वर मंडळी जेवतात तर उत्सव काळात ही संख्या दहा हजारावर जाते सुमारे नियमित ३०० माणसांना अन्नदान येथे केले जाते. श्रीसाईनाथ विद्यालयात शिक्षण घेणारी गरीब मुले ही पण येथे विनामूल्य भोजन घेतात. तसेच श्रीसाईनाथ हॉस्पीटलातील सर्व रोग्यांना विनामूल्य

भोजन येथूनच पोचविले जाते. सकाळी ६-३० वाजता या भोजनगृहातील स्वयंपाकाच्या कार्याला कामकाजाला सुरूवात होते व रात्री १०-३० वाजता या भोजन गृहाची दारे बंद केली जातात. साधारणतः महिन्याला ८० ते १०० पोती गहू, १०० पोती तांदूळ व २५ पोती साखर एवढा शिधा लागतो. तांदूळ हा प्रामुख्याने आंध्रप्रदेशातून विजयवाडा येथून आणला जातो. या भोजनगृहात सुमारे शंभर कर्मचारी वावरत असतात. त्यापैकी ४७ मुले वाढपी म्हणून आहेत तर २२ महिला पोळ्या लाटणे, व स्वयंपाक या कामात गुंतलेल्या असतात.

शिर्डी संस्थानच्या या आवाढव्य भोजनगृहात ११० पंखे लावलेले असून असंख्य नळीचे दिवे आहेत. रात्रीच्यावेळी हे भोजनगृह या दिव्यांच्या प्रकाशात लख्ख उजळून निघते. पनामा येथील टेक्स्टाइल युनिव्हर्सलचे श्री. जे. बी. मोहिनानी यांनी १२० सिलींग फॅन्स व ३०० ट्यूब लाईटस सुमारे ६५ हजार रु. किंमतीचे हे साहित्य देणगी दाखल म्हणून दिलेले आहे. तर श्री. नटवरलाल भोगीलाल पटेल यांनी शीत गृहासाठी व थंड पाण्याच्या यांत्रिकी व्यवस्थेसाठी सुमारे सव्वा लाख रुपये देणगी दाखल दिले आहेत.

भोजन दालनामध्ये सर्वांना सहज दर्शन घडेल अशी सुंदर श्रीदत्त मूर्तीची स्थापना केलेली असून श्रीबाबांची एक टोलेजंगी तसबिर पण मांडलेली आहे. यामुळे क्षुधा शांती बरोबरच मनःशांती या दोन्हीही गोष्टी येथे लाभतात. भोजनगृहाच्या पूर्वेकडील बाजूला व दक्षिणेकडील बाजूला हात धुण्यासाठी नळांची सोय करण्यात आलेली आहे.

भोजनगृहाचा उत्तरे कडील निम्मा भाग स्वयंपाक गृह व इतर तदनुषंगिक विभाग आहेत. तसेच तिथे भांडीठेवण्यासाठी विस्तीर्ण कप्पेगृह भांडी धुण्याकरिता जलव्यवस्था, तसेच धान्य साठविण्यासाठी पुरेसे मोठे गोदाम भाजीपाला व दुध वगैरे जलद नाशवंत होणारा माल व्यवस्थित ठेवण्यासाठीं खोल्या भोजनगृहप्रमुखाचे कार्यालय व नैवेद्य कोठी इ. खोल्या आहेत. नैवेद्य कोठींत श्रीसाईबाबांचा दररोजचा सकाळ संध्याकाळचा नैवेद्य हा तयार केला जातो, तसेच श्रीसत्यनारायण पुजेसाठीं लागणारा शिऱ्याचा प्रससादही येथेच तयार केला जातो. तीन महिला या ठिकाणी हे कार्य करीत असतात. श्रीबाबांना सकाळी ८-३० वा. न्याहारी दिली जाते. यावेळीं ताटात चार चपात्या, १ मूद गोड शिरा, १ वाटी साखर घालून दुध, चटणी कांदा हे पदार्थ असतात व हे न्याहारीचे ताट पुजारी फक्त द्वारकामाईतच धुनीसमोरच्या तसबीरीला दाखवितात. दुपारी पूर्ण जेवण श्रीबाबांना ताटात घालून समाधीमंदिर, गुरुस्थान व लेंडी बागेतींल श्रीदत्तमंदिर येथे दाखविले जाते. या ताटातून चपात्या, वरण, भात, दोन भाज्या, बेसनलाडू, तांदळाची खीर, दहीं, तुपाची वाटी, कांदा चटणीं कोशिंबीर

हे पदार्थ असतात. कुटलेला वीडा पण असतो. दुपारच्या आरतीं पूर्वी हा महानैवेद्य बाबांना पुजारी दाखवितात. रात्रीं धूपारतीं झाल्यावर ज्वारींचीं भाकरी व पिठले (झुणका) कांदा, शेंगदाण्याची चटणी या पदार्थांचा नैवद्य बाबांना दाखविला जातो. लसणाच्या चटणीचा उपयोग कधींच बाबांच्या नैवेद्यात करीत नाहीत.

संस्थानात पाहुणे म्हणून आलेल्या निमंत्रितांच्या साठी पण खास सोय करण्यात आलेली आहे. भोजनगृहातील श्री दत्तमूर्तीच्या पाठीमागे किंवा पश्चिमेच्या बाजूला 'व्ही आयपी रुम' म्हणून प्रशस्त खोलीची तरतूद केलेली असून तिथे १६ खुर्च्यांची सोय करण्यात आलेली आहे त्यामुळे एका वेळेस तिथे सोळा मंडळी भोजन करू शकतात.

भोजनगृहाची ही प्रचंड इमारत मुंबईच्या श्री. वालजीभाई गज्जर यांच्या नवजीवन कनस्ट्रक्शनने श्री. आर. पी. तलगिरी व श्री. एस. के. आठल्ये या नामांकीत वास्तूशास्त्रज्ञाच्या, तसेच आर. सीं. सी. स्पेशालिस्ट दामले ठाकूर देसाई यांच्या सल्ला व मार्गदर्शनाखाली बांधलेली आहे. येथला पाणी पुरवठा व ड्रेनेजचे व प्लंबिंगचे काम डी. बागवे आणि कंपनी यांनी केले असून विद्युत प्रसारणाची योजना मुंबईचे पंडित इलेक्ट्रिक स्टोअर्स यांनी केली आहे. लोखंडी कैच्या तयार करण्याचे व त्या बसवण्याचे अवघड काम ब्रीझ वुइंडो मॅन्युफॅक्चरींग कंपनीचे श्री. झिल्का यांनी केले असून वॉटरप्रुफींगचे काम इंडिया वॉटर प्रुफिंग कंपनीचे श्री. पटवर्धन यांनी केले आहे. या भोजनगृह इमारतीचे रंगकाम मे. राम नारायण इंगळे कंपनीने नवजीवन कनस्ट्रक्शन मार्फत केलेले आहे. शमारा इंडस्ट्रीजचे श्रीं. रानडे यांनी भोजन गृहातील फर्निचरचे व भोजन बाकावरील स्टेनलेस स्टीलचा पत्रा उत्तम प्रकारचे ठोकून देण्याचे काम केले आहे. या इमारतीच्या बांधकामाला महाराष्ट्र राज्य शासनाकडून पुरेसे सिमेंट मिळू शकले नाही अशा वेळी आंध्रप्रांताचे मुख्यमंत्री डॉ. एम. चेन्ना रेड्डी यांनी उदार अंतःकरणाने पाचशे टन सिमेंट देणगी म्हणून दिले आहे ही विशेष लक्षात ठेवण्यासारखी वस्तूस्थिती आहे, व त्यामुळेच बांधकाम वेगाने पूर्ण होऊ शकले. संपूर्ण बांधकामावर रात्रंदिवस देखरेख संस्थानचे स्थानीय स्थापत्य शास्त्रज्ञ अभियंता श्री. डी. सी. पाटील यांची होती याकामी त्यांनी अपार कष्ट घेतलेले आहेत. या नवीन विशाल भोजनगृहाची भोजनासिद्ध आखणी व रूपरेषा माजीं कोर्ट रिसिव्हर श्री. का. सी. पाठक यांचे कारकिर्दीत करण्यात आली होती विद्यमान न्यायालय धारक साहेब श्री. क. हि. काकरे यांचे कारकिर्दीत तयार झालेली ही भव्य वास्तू संस्थानचे एक आकर्षणच ठरली आहे.

सध्या या भोजनगृहाचे प्रमुख म्हणून एक तरुण अधिकारी जबाबदारीने संपूर्ण कामकाज बघतात. त्यांचे नाव आहे श्री. जितेंद्र सी. मोदी, त्यांचे पूर्वी या जागेवर श्रीभागचंद . बाकलीवाल हे काम पहात होते.

卐

१८५

# माझी बाबांच्यावर दृढ श्रद्धा

—श्रीमंत अनुबाईवहिनी साहेब घोरपडे
निर्मळप्रभा, भाऊसिंगजी रोड
कोल्हापूर ३

● श्रीसाईलीला मासिक १ एप्रिल १९८२ रोजी ६१ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे. तेव्हा ह्या अंकात जी आमचेसारखी वृद्ध मंडळी, श्री साईबाबांचे हयातीत अनेकदा दर्शन सुखाचे भाग्य लाभलेली अद्याप हयात आहेत, त्यांचेकडून श्री साईबाबांचेबद्दल चार शब्द प्रसिद्ध व्हावेत असे संपादकांना वाटते व ते योग्यच आहे. त्यांचे पत्राप्रमाणे चार शब्द लिहावेत असे वाटले वरून खालील अनुभव कळवीत आहे.

मी स्वतः शक्य तो बाराक्षारांचीच औषधे घेते व माझे नोकर अगर आवारात रहाणारे मंडळीनाही किरकोळ आजारावर बाराक्षारांची औषधे देते. परंतु औषधांच्या पुड्या श्री साईबाबांचे फोटो पुढे ठेवून मनोमय प्रार्थना करून काही वेळानंतर ती औषधे देते व श्रीसाई कृपेने त्या औषधांचा योग्य तो परिणाम होऊन आजारी माणसाना बरे वाटू लागते. औषधाबरोबर श्रीबाबांची उदीही देते व तीही पोटात घेणेस सांगते.

एका तरुण जोडप्यांचे पहिल्याच मुलास प्रकृती बिघडून फारच त्रास होत होता. नेहमीप्रमाणेच मी श्रीबाबांना प्रार्थना केली, त्या लहान मुलास औषध दिले व त्या तरुण जोडप्यास सांगितले की मुलास आराम वाटल्यानंतर श्री साईबाबांचे सेवेस ५ रु. पाठवावेत. श्रीबाबांचे कृपेने तो मुलगा बरा झाला व त्याचे आईवडिलांस पुढे मुलासह शिर्डीस जाऊनच दर्शन घेऊन येणेची उत्कट इच्छा होऊन काही महिन्यापूर्वी ती मंडळी शिर्डीस जाऊन आली.

मी स्वतः थिऑसॉफिकल सोसायटीची अनेक वर्षे मेंबर आहे व येथील श्रीकृष्ण थिऑसॉफिकल लॉजची प्रेसिडेंट होते, आता कोल्हापूरमध्ये मेंबर्सच फार कमी झाले त्यामुळे आमचा लॉज जवळ जवळ संपलाच आहे. मी लहानपणापासून संत सत्पुरुषांची चरित्रे वाचीत असे व ६ वे वर्षापासून ९ वे वर्षापर्यंत अनेकवेळा श्रीसाईबाबा शिर्डी यांचे दर्शनाचा लाभ झाला, व जीवनात जी संकटे कोसळली त्या सर्वांना

वयाच्या अवध्या २४ वे वर्षापासून धैर्याने तोंड देऊन आपत्काळासही त्या संतांचे वरील श्रद्धेने पार पडले. सुखाचे काळात तरुण वयात श्री साईबाबांचीही जेवढी व्हायला हवी तेव्हढी स्मरण पूर्वक सेवा घडली नाही हे खरे, तरी त्यांचेच आशीर्वादाने जीवनातील कर्तव्ये योग्य रीत्या पार पाडू शकले ! आयुष्य तर भरपूरच वाट्याला आले आहे व शक्य तो ते आत्मोन्नतींत व्यतीत व्हावे ह्या इच्छेने मिळेल त्या संधीचा सत्पुरुषांचे ग्रंथ वाचणेत काळ चालवायचा प्रयत्न करीते, परंतु इतर पुष्कळ जणांना ( ज्याना मी उदी दिली व ते संकट मुक्त झाले ) श्री साईबाबा स्वप्नात दर्शन देतात तसे मला फारच क्वचित दर्शन देतात, त्याचे मात्र फार आश्चर्य वाटते.

श्री साईसच्चरिताचा दरवर्षी मी सप्ताह करते. गेल्या काही महिन्यात अनेक संकटे येऊन गेल्यामुळे दरसाल पेक्षा सप्ताह करणेस उशीरच झाला तरी श्री बाबांनी तो करून घेतला.

साईबाबा फार श्रेष्ठ सत्पुरुष होऊन गेले व आता पुन्हा ते अवतरले असून पूर्वीच्या अवतारातील आमच्यासारख्यांना त्यांचे भक्तांना ते आशीर्वाद देतात.

☆

## गॉड–ईश्वर

आपण हे जग, हे ब्रह्मांड व्यापणाऱ्या शक्तिला देव, ईश्वर इत्यादी शब्दांनी संबोधतो. इंग्रजही त्या अनाकलनीय शक्तिला गॉड (GOD) म्हणतो या GOD शब्दाचा अर्थ आपल्या ब्रह्मा–विष्णु–महेश शब्दांशी कसा निगडीत आहे–तो पहा—

| | |
|---|---|
| G–Generation | 'उत्पत्ती' म्हणजेच – ब्रह्मा |
| O–Operation | पालन पोषणाचे कार्य – विष्णु |
| D–Destruction | 'विनाश' म्हणजे – महेश |

—बबन डी. येरम
घाटकोपर, मुंबई–८६

# शिरडीच्या प्रेमपंथावर

☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆☆

—श्री. चकोर आजगावकर
वाय. ११/१७० सरकारी वसाहत, वांद्रे (पूर्व)

● श्रीसाईबाबांच्या विभूतिमत्वाला माझ्या जीवनात एक जिवंत चैतन्याचे स्थान आहे. कारण माझ्या मूळ तत्वज्ञान व योग प्रेमाला श्रीबाबांनी आपल्या दिव्य स्पर्शाने ज्ञान भक्तीची जोड दिली आहे. ही किमया बाबांनी फारच अद्भुतरीत्या घडविली आहे. '**सगुण निर्गुण एक गोविंद रे**' हे मला बाबांनी प्रत्यक्ष अनुभवांच्या द्वारे शिकविले आहे. 'श्री**साईगीतायन**' या दिव्य गीतमाळेचे अमृतलेणे या अनुभवातूनच फुललेले आहे. म्हणूनच या संगीतमय काव्याची सुधा मी रसिकांप्रती देऊ शकलो.

● मी लहानपणापासूनच काव्य व योग या दोन जीवननिष्ठांचा उपासक होतो. वयाच्या तेराव्या वर्षी माझी काव्यवीणा झंकारु लागली, त्याचवेळी मी एकांतात पातंजलयोगाची धारणा करू लागलो होतो. उपनिषदांच्या तत्वज्ञानाचा मागोवा मी बुद्धीला तो जितपत आकलन होई, तितपत घेऊ लागलो. निर्गुण परब्रह्माला एकांतात ध्यान, मनन, चिंतनाने जाणण्याचा त्यावेळचा माझा प्रयास होता. भजन, संकीर्तन, प्रवचने, पूजा, भक्ति याबद्दल मला त्याकाळात जवळ जवळ आदर नव्हताच सगुण साकार सृष्टीत प्रभूला पहाणाऱ्याला मी अंधश्रद्धाळू किंवा दांभिक समजत असे. स्वप्रयत्नांनी मी कुंडलिनी कळत नकळत जागृत करून घेतली. परंतु तिचे नाडीचक्रातील तप्त उद्रेक **भस्त्रिका** वा योग क्रिया पाहून घाबरून जाऊ लागलो.

● अशा काळात एका चित्रकार मित्राच्या घरी फडक्याची गाठ शिरामागे मारलेली श्रीसाईप्रतिमा पहावयास मिळाली. ती मी थोड्याशा भयचकित मनानेच पाहिली. ही मूर्ती माझे जीवन व्यापील अशी पुसट कल्पना त्यावेळी मला आली नाही. पुढे योगायोगाने श्री. कवडे नावाच्या एका लेखकाने लिहिलेले श्रीसाईचरित्र माझ्या वाचनात आले. त्यात लेखकाला बाबांनी दिलेल्या लेखन प्रेरणांचा चमत्कृतीपूर्ण संदर्भ बऱ्याच जागी होता. शिरडीच्या फकिराची ही अलौकिक करणी रहनी व जबाब पाहून माझे मन आणखी विस्मयचकित झाले. साहित्य प्रतिभेच्या द्वारातून श्रीबाबा माझ्या जीवनाला सरळ सरळ स्पर्श करतील असे मला त्यावेळी वाटले नाही.

● १९५५ साली महाराष्ट्र सरकारने अस्पृश्यता निवारण या विषयावर नाटकांची स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेसाठी मराठीतील बरेच प्रथितयश नाटककारानी आपल्या लेखण्या व अस्तन्या सरसावल्या होत्या. मीहि मित्रांच्या आग्रहामुळे स्पर्धेत उतरलो. मला नाटकाचे बक्षीस मिळेल याची खात्री यत्किंचितही नव्हती. सरकारी मध्यवर्ती मुद्रणालयातील एक मित्र नाटकाच्या हस्तलिखितांची नक्कल करण्यास मला मदत करीत असत. ते अकस्मात शिरडीस जावयास निघाले. ते मला सहज म्हणाले, ‘काय हो मी शिरडीस निघालो आहे. बाबास काही सांगणे आहे का ?’ मी म्हटले, ‘स्पर्धेत यशस्वी झालो तर शिरडीस येतो म्हणावे’ खरोखरच ९ मे १९५५ च्या वृत्तपत्रात मला एक हजारांचे प्रथम पारितोषिक मिळाल्याची वार्ता प्रसिद्ध झाली. मी त्या जातधर्म पंथातीत सत्पुरुषाच्या पुण्य भूमीत पहिले पाऊल टाकले. शिरडीची ती भूमी, तेथील बाबांची लीलास्थळे, तेथील वातावरणात दरवळणारा मानवता, सेवा आणि भक्तरक्षणार्थ केलेल्या चमत्काराचा सुगंध अनुभवून मन मोहरुन गेले. बाबांच्या बद्दल मनात प्रेमादराची भावना रुजू लागली. बाबांनी बुद्धीतून हृदयात हळूच मृदुपणे पाऊल ठेवले म्हणाना !

● आयुष्याची वाटचाल कधी खडतर, तर कधी सुखकर अशा मार्गाने चालली होती. छाया प्रकाश, हारजित अशा द्वंद्वातून मी जात होतो. श्रीबाबांची आठवण मनाला प्रेमाची सावली देत होती. आपल्या जीवनाला एक अदृश्य शक्तीचा आधार लाभत आहे, याची जाणीव वारंवार होत होती. तथापि अजून साधकावस्थेची खरी परिक्रमा सुरू झाली नव्हती.

● १९६१ साली मी बऱ्याच कठीण सांसारिक व व्यावसायिक परिस्थितीतून जात होतो. अशावेळी मला एके रात्री श्री हनुमंताचा दृष्टांत झाला. एका निबिड अरण्यात दाट पर्णराजीत बसलेली हनुमंताची दिव्याकृती मजकडे पाहून उद्गारली : **‘तुला शक्तीचा लाभ होईल’** तेव्हापासून शक्ती तत्त्वाचा मी जाणून बुजून शोध घेऊ लागलो. हनुमान ही रुद्र शिवशक्ती होती. बाबांचे पाथरी परभणीचे घराणे हनुमंतास कुलदैवत मानीत असे. हनुमंताकडे बोट दाखवून बाबा म्हणत ‘हेच माझे आईवडील !’ बाबांची राम व हनुमान भक्ती जगप्रसिद्ध आहे. बाबांचाच जणू शक्तीलाभाचा आदेश होता. १९६७ पर्यंत अनेक तीर्थांची दर्शने घडली. साधुसंतांची संगत लाभली. शेवटी १९६७ मध्ये पुण्याचे शक्तीपातयोगी गुळवणीमहाराज यांचेकडून कुंडलिनीयोगाची दीक्षा मिळाली. या योगातील योगक्रिया, मुद्रा, आवेश याचे अनेक अनुभव १९७० पर्यंत येत गेले. शेवटी शक्ती कंठावरील विशुद्धीच क्राजवळ खेळत असता एकाएकी **अशारीर** शब्द उमटले, **‘अरे ! मी तयार**

आहे ' माझे मन स्तिमित झाले. हृदय हेलावून गेले. बाबा मार्गदर्शनास जणू तयार होते. योगाबरोबर भक्तीचे प्रेमपाठ द्यावयास आतूर होते. एक गणेशभक्त साईपरायण सत्पुरुष डॉ. श्री. गवाणकर यांची भेट घडली. त्यांनी गणेश उपासना सांगितली. १९७० सालीच कारवार येथे गणेशाचा दृष्टांत झाला. पुण्याचे डॉ. घटवाई यांचेकडे जावयाचा आदेश झाला. डॉ. घटवाई हे परम गणेश भक्त होते. शिवाय नाथपंथी योगीहि होते. नागपूरच्या सिद्ध पुरुषाची म्हणजे नाथसिद्ध ताजुद्दिनबाबांची त्यांना दीक्षा होती. ते साईबाबांना आपले गुरुबंधू मानीत. ताजुद्दिन हेच पूर्वकालीन व्यंकुशहा होते. कबीर जन्मात बाबाना रामभक्ती शिकवणारे रामानंद, हेच व्यंकुशहा झाले. पुढे साईबाबांचे समकालीन सिद्ध ताजुद्दीन म्हणून प्रसिद्धी पावले. साईबाबा त्याना ' सोन्याचे झाड ' म्हणत. ताजुद्दीन बाबाना ' बेटा बच्चा ' म्हणत. हे **जन्म-जन्माचे** नाते नाथपंथी ज्ञानयोगदीक्षेने सांधले होते. बाबांच्याच कृपेने माझी व डॉ. घटवाई यांची पुण्यास भेट झाली व मला नाथपंथी योग भक्तीचा सुवर्णकलश मिळाला. बाबांचा सहजयोग समजला. ज्ञान भक्ती सगुणनिर्गुण याची अतूट एकता कळली. डॉ. घटवाईच्या **स्पर्शाने** मला तुरीयावस्थेचे अनुभव येऊ लागले. ही बाबांनी माझ्या जीवनात घडविलेली आध्यात्मिक क्रांती ठरली. हृदयातील भावशक्ती शरीरातील क्रियशक्ती व आज्ञाचक्रातील ज्ञानशक्ती एक झाली आणि आदिशक्ती त्रिपुरेच्या गणमायेचा व गुणातीत मूळमायेचा स्वरुप बोध मला बाबांनी डॉ. घटवाई मार्फत घडविला. ज्ञानयोगाला सगुणभक्ती धारा मिळाली !

● विशुद्धीचक्राजवळच्या वैखरीवाणीच्या केंद्रातून एकदिव्य प्रेमकाव्य १९७०-७१ मध्ये झरू लागले. तेच ' **नवशक्ती** ' रविवार आवृत्तीद्वारे ' **श्रीसाईगीतायन** ' म्हणून प्रसिद्ध झाले. गीता, भागवत, उपनिषदे याचे सार भाव काव्याद्वारे प्रगट होत गेले. शब्दांची मंत्रमयता, भक्तीची भावमयता, ज्ञानाची प्रकाशमयता, आनंदाची अमृतमयता ' **श्री साईगीतायना** '**च्या** प्रत्येक शब्दातून पाझरू लागली. हे वर-काव्य लिहिताना पदोपदी मला सगुण दर्शने होत गेली, दृष्टांत झाले, गूढ कूट प्रश्नांची सहज उकल होत गेली. ' **श्रीसाईगीतायन** ' हे बाबांनी माझ्या करवी भक्तांना दिलेले प्रेमाचे उपायन आहे. मला शिकविलेल्या योग भक्तीचे प्रात्यक्षिकच आहे. ' **श्रीसाईगीतायना** '**च्या** शब्दातच या लेखाचा शेवट करूया :—

**चकोर झाला शशिकर सुंदर**
**चंद्रहि बनला आज चकोर**
**समरसतेच्या पौर्णिमेत या सकलमुक्तिचे धाम ।**
**प्रभो घ्या चरणी लाख प्रणाम ।**

अशा प्रकारे योगतत्त्वज्ञानाच्या गिरीगव्हरातून माझ्या जीवनाची गंगा शिरडीच्या प्रेमपंथावर प्रगटली. ✩

# मी माझ्या भक्तांचा अंकीत

—प्रो. एच. बी. महाले, एम्. एस्. सी.
अध्यक्ष, गणित विभाग,
ज. ह. शासकीय महाविद्यालय
बैतुल ( म. प्र.)

● एकदा तात्यासाहेब नूलकरांचे पंडित बावांचे मित्र शिरडीला श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी गेले. शिरडीला पोहोचल्याबरोबर अगोदर ते मशीदीत ( द्वारकामाईत ) गेले व बाबांना साष्टांग नमस्कार करून क्षणभर शांतपणे बसले. बाबांनी त्यांना म्हटले—'जा, दादाभटांच्या येथे, जा असे जा,' व त्यांना हाताने रस्ता दाखवून जावावयास लावले. श्री पंडित, दादाभटांच्या येथे गेल्यावर दादांनी त्यांचे योग्य स्वागत केले. दादा बाबांच्या पूजेसाठी निघाले. त्यांनी श्री पंडितांना—'येता का' म्हणून विचारले. ते दोघे बाबांजवळ पोहोचले. दादांनी बाबांचे पूजन केले. ह्यावेळेपर्यंत बाबांना गंध लावण्याची हिम्मत कोणासही झाली नव्हती. फक्त म्हाळसापती बाबांच्या गळ्यांना गंध लावत आणि इतर लोक पायाला लावत.

पंडित हे भोळे भावीक होते. त्यांनी दादांच्या हातची पूजेची तबकडी आपल्या हाती घेतली. श्रीसाईबाबांचे मस्तक एका हाताने धरून दुसऱ्या हाताने बाबांच्या कपाळावर त्रिपुंड्र लाविला. श्री पंडिताचे हे धाडस पाहून दादांच्या मनात धासधूस व्हावयाला लागली, कारण आतापर्यंत बाबांच्या कपाळावर गंध कोणीच लावू शकले नव्हते. दादा मनात म्हणाले, श्री पंडितांचे असे कसे धाडस ? आता बाबा खूपच रागावतील. जे घडावयाचे नव्हते, तेच घडले; परंतु बाबा एक अक्षरही बोलले नाहीत ते पंडितावर थोडेसुद्धा रागावले नाहीत. उलट थोडे प्रसन्न दिसले. ह्यामुळे दादांच्या मनात रुखरुख राहिली की ही काय गोष्ट आहे. काही समजेना. तरी त्यांनी ही वेळ जाऊ दिली. मात्र त्याच दिवशी संध्याकाळी दादांनी बाबांस विचारलेच की आम्ही कपाळावर थोडे गंध लावण्याचा प्रयत्न जर केला तर तुम्ही तसे करू देत नाही आणि आज सकाळी मग असे का घडले. तेव्हा बाबांनी उत्तर दिले, 'दादा, श्री पंडिताचा गुरू ब्राह्मण आहे. मी जातीचा कुणीही जरी असलो तरी त्यानी मला तोच मानून पूजन केले. मी ब्राह्मण आहे व ह्या अपवित्र अपवित्राचे पूजन कसे करू ही कल्पना

सुद्धा त्याच्या (पंडिताच्या) मनाला शिवली नाही. अशा प्रकारे त्याने मला फसविले. मी त्याला नाही म्हणू शकलो नाही. त्याच्यापुढे मी हरलो. त्याचा मी अंकित झालो.'

हे सर्व ऐकून दादांना वाटले की बाबांनी नुसता विनोद केला आहे. पण त्यांनी जेव्हा पंडिताकडे विचारपूस केली तेव्हा त्यांना माहित पडले की पंडित हे धोपेश्वरीचे रघुनाथ पंडित यांचे शिष्य आहेत. (ह्या धोपेश्वरीच्या पंडितांना 'काका पुराणिक' म्हणून ओळखत.)

पंडितानी काका पुराणिकांचे ध्यान करताच त्यांना तसाच अनुभव बाबांनी दिला—'जया मनी जैसा भाव तया तैसा मी पाव.' ह्या गोष्टीवरून साईबाबांनी दर्शवून दिले की—

'मी माझ्या भक्तांचा अंकित।
देतसे हांक हाकेला॥' श्री साई सच्चरित्र—अ० ११

ह्याच प्रसंगी स्मरण झाले म्हणून रामायणातील शबरीची भिल्लीण कथा येथे थोडक्यात लिहितो. शबरीने राजा रामचंद्रास खाण्यासाठी बोरे आणली. रामचंद्र आल्यावर शबरी प्रत्येक बोर स्वतःच्या तोंडात चावून पाहायची आणि गोड असल्यास रामचंद्रास खावयाला द्यायची व आंबट असल्यास बाजूला ठेवायची. रामचंद्रांनी शबरीने दिलेली बोरे खाल्ली. हे पाहून लक्ष्मणास खूप राग आला, तो यामुळे की एक भिल्लीण अयोध्येच्या राजाला उष्टी बोरे खावू घालण्याचे धाडस कसे करते. ते रागाने शबरीकडे पाहू लागले. राजा रामचंद्रास (जे विष्णूचा अवतार होते) याची कल्पना येताच लक्ष्मणास सांगितले की 'लक्ष्मणा, तिला उष्टी बोरे खावू घालू दे. तिच्या श्रद्धेमुळे, भक्तीमुळे मी तिच्या अंकित झालो आहे. मी तिला नाही म्हणू शकत नाही व हे तू समजू शकणार नाहीस. हा विषयच निराळा आहे.

म्हणजे रामावतारातसुद्धा 'मी माझ्या भक्तांचा अंकित' म्हणून ईश्वराने दाखवून दिले. त्रेतायुगात जे राम होते त्यानीच कलियुगात साईबाबांच्या रूपाने अवतार घेतला आहे. जय साईराम!

★

# जज्जसाहेबांचा अद्भुत अनुभव

—श्री. ग. वा. उर्फ नानासाहेब जोशी
चिटणीस श्री उपासनी कन्याकुमारी स्थान
साकुरी, जि. अहमदनगर

● श्रीसाईबाबांनी इ. स. १९१८ मध्ये महासमाधी घेतली त्यानंतर जवळ जवळ पाव शतक इ. स. १९४१–४२ पर्यंत शिर्डीस कागदी शुकशुकाट असे. रोजच्या आरतीला पुजारी, दोन चार सेवेकरी भालदार-चोपदार स्थानिक व ग्रामस्थ सात-आठ व तितकेच साधारण यात्रेकरू मिळून जेमतेम वीस-पंचवीस लोक असत. वर्षातील दसरा, रामनवमी, गोकुळ अष्टमी अशा दोन चार उत्सवास थोडीफार गर्दी होत असे. एरवी जुन्या काळातील मामलेदार कचेरी समोर स्टॅम्पवेन्डर बसत असे. त्याप्रमाणे जुन्या पांगारी पेटी समोर पोत्यावर श्री बापुराव भोजनाचे पाच आणे घेऊन दीड इंच रुंद चार इंच लांब अशा पांढऱ्या कागदावर चिठ्ठ्या देत असत.

काय योगायोग असेल तो असो. इ. स. १९४१ च्या शेवटी (ता. २४ डिसेंबर ला) श्री उपासनी महाराजांनी आपले अवतार कार्य संपवले. इ. स. १९४२ मध्ये जागतिक दुसरे महायुद्ध पेटले आणि त्याच सुमारास मद्रासी लोकांच्या झुंडीच्या झुंडी शिरडीस सुरू होऊन अतोनात गर्दी होऊ लागली. त्यात म्हैसूर कर्नाटक या बाजूचेही कांही लोक असत. अशा या दक्षिणेकडील लोकांच्या शिर्डीस होणाऱ्या गर्दीच्या काळात इ. स. १९४३ साली अहमदनगरला इनकमटॅक्स ऑफिसमध्ये रिटर्नस भरण्यास गेलो होतो. ऑफिसचे काम संपण्यास विलंब लागला म्हणून मला नगरला मुक्काम करावा लागला.

त्यावेळी नगर-कापड बाजाराच्या पश्चिमेकडील गल्लीत श्री. करकरे यांचे सुप्रसिद्ध वैभवशील प्रशस्त उपहारगृह होते. पुण्याची उंसळ नगरकरांना प्रथम श्री. करकरे यांनी खाऊ घातली म्हणतात. आम्हा साकुरीकरांची श्री करकरे मोठ्या संस्थानिकाप्रमाणे बडदास्त ठेवीत.

दुसरे दिवशी सकाळी सातचे रेल्वेने निघालो. साकुरीस जायचे म्हणून चितळी स्टेशनचे तिकीट काढले होते. इन्कम टॅक्सचे कागद पत्र मला कोपरगावी मामलेदार कचेरीत रिफंड साठी दाखल करायचे होते. तेव्हा सरळ कोपरगावी जाऊन तेथील

काम आटोपून नंतरच साकुरीस जावे असा विचार केला. त्याप्रमाणे चितळी मास्तराजवळ घरी निरोप दिला.

मी बसलो होतो तो डबा लांबट चांगला प्रशस्त होता. त्यात साठ-सत्तर उतारू सहजरीतीने बसले होते. मी वायव्य कोपऱ्यात खिडकीशी बसलो होतो. गाडीने पुणतांबे स्टेशन मागे टाकले. संवत्सरहि मागे गेले. समोरच्या आग्नेय कोपऱ्यात बसलेले पन्नाशीच्या आत बाहेर सुखवस्तु, सुशिक्षित असे एक गृहस्थ आमच्या बाजूला येऊ लागले. अंगात पिवळसर रेशमी कोट, चॉकलेटी टोपी, पायघोळ धोतर, बूट-पायमोजे असा त्यांचा पोशाख होता. त्यांच्या बाजूला जवळच संडास असताना हे इकडे कोठे चालले ? जाऊ द्या. कोठे का जाईनात. आपल्याला काय करायचे असे मी मनात म्हणत आहे तोवर ते गृहस्थ अगदी मजजवळ येऊन नमस्कार करून इंग्रजीतून 'मला शिर्डीस जायचे आहे. कृपया मार्गदर्शन करा' म्हणाले. मी होकारार्थी मान डोलवून यांना आपण कोठे पाहिले असावे असे स्मरण करीत असतानाच ते इंग्रजीतूनच जरा हलक्या आवाजात म्हणतात, 'नाही नाही. आपण एकमेकास कधीच भेटलो नाही. हे बघा मी शिर्डीस प्रथमच जात आहे. मी बेळगावला जज्ज असतो मी जर कोपरगावच्या जज्जना लिहिले असते तर त्यांनी माझी शिर्डीस जाण्याची सहजच व्यवस्था केली असती. परंतु साधुसंताकडे जाणे सर्वानाच पसंत असते असे नाही आणि दुसऱ्याला त्रास नको म्हणून तो विचार मी टाळला. आता कोपरगावजवळ आहे आता या डब्यातील लोकात शिर्डीस जाणारा कोणी दिसतो का म्हणून बारकाईने पाहू लागलो. तोच साईबाबा माझ्यापुढे प्रगट झाले आणि त्यांनी आपल्याकडे बोट दाखविले. मला फार आनंद झाला मी या गर्दीतून वाट काढीत आपल्याकडे आलो....
'मी अक्षरशः साईबाबांचे लीलेचे कौतुक करीत त्यांना' हो जरूर अवश्य म्हणालो.

कोपरगाव स्टेशन येताच आम्ही दोघे एकाच टांग्यातून कोपरगाव टांगा स्टँडवर आलो. मी खाली उतरून, टांगेवाला ओळखीचाच होता त्याला '....अरे साहेबांना ताबडतोब शिर्डीस नीट सांभाळून पोहोचते कर. जरूर ते भाडे देतील....' असे बजावले. आम्ही भक्तीभावपूर्वक हस्तांदोलन करून परस्परांचा निरोप घेतला. मी मामलेदार कचेरीचे रस्त्यास लागलो आणि साहेबांचा टांगा शिर्डीच्या मार्गावर धावू लागला.

# तुझ्या माझ्यातील भिंत पाडून टाक !

—श्री. सुरेश सातपुते
जाम बिल्डींग मुंबई १२

'अरे ! ये ये ! तुझ्या माझ्यातील ही भिंत पाडून टाक ! ये लवकर !' असे श्रीसाईबाबा सपटणेकरांना उद्देशून म्हणाले.

'चल हट !' असे म्हणून काही दिवस रखवडल्यानंतरच पदस्पर्श दर्शनाची संधी श्री समर्थांनी सपटणेकरांना दिली. ती देखील शामरावांच्या मध्यस्तीने अशी परवानगी दिलेली असुनही, जेव्हा बाबांच्या 'चल हट' मुळे गांगरलेले सपटणेकर मशीदीच्या पायऱ्याही चढण्यास धजेनात तेव्हा त्यांना उद्देशून समर्थांनी वरील उद्गार काढले. ही गोष्ट सर्व साईभक्तांना ज्ञात आहेच.

श्री समर्थ साईबाबांसारखे, अध्यात्मातील अंतिम स्थिती प्राप्त झालेले सत्पुरुष अध्यात्मशास्त्रावर फाल्तू बडबड कधीच करणार नाहीत. कारण त्यांचा भार असतो. प्रत्यक्ष स्वानुभव देण्यावर वा, आचरणावर ! कारण अध्यात्म आचरणात आणून त्यामुळे प्राप्त होणारा स्वानंद स्व अंतरातून अनुभवल्याखेरीज त्यातील खरी गंमत वा मर्म समजत नाही हे ते जाणून असतात. म्हणून अध्यात्मावर बोलताना ते अत्यंत मोजके परंतु महत्वाचे किंवा व्यापक अर्थ असलेले शब्द ते बोलून जातात. वरील उद्गारांतून हेच वैशीष्ट्य दिसून येते अर्थात वरील शब्द मोजके असले तरी ह्यात किती अर्थ भरलेला आहे. त्याचा परामर्ष सांप्रत या ठिकाणी योजिला आहे. वरील सामान्य वाटणाऱ्या उद्गारात अध्यात्माचे सारे सारच श्री समर्थांनी या तिन चार शब्दात सांगून टाकले आहे.

म्हणून वरील उद्गारांचा अर्थ काय ? सपटणेकरांना बाबांना नेमके काय सांगावयाचे होते त्याचा आज आपण संतांच्या वचनाधारे अर्थ पाहू या म्हणजेच आपणाला शास्त्र प्रचिती बरोबरच गुरुप्रचिती येऊन, आपणांस आत्म प्रचितीकडे वळता येईल. कारण या तिन्ही प्रचिती एकत्र आल्या खेरीज दृढभाव कदापि निर्माण होत नाही.

तुझ्या माझ्यातील 'भिंत' असे ज्याला बाबा सपटणेकरांना उद्देशून म्हणाले आहेत. किंबहूना आपल्यामध्ये व बाबांमध्ये जी भिंत आहे. ती भिंत म्हणजे अहंकार

होय हा अहंकारच जीवा-शिवाचे विघटन घडवून आणतो. आणि आपणास सत्य स्वरुपा पासून वेगळे ठेवून दुनियेत नाना प्रकारे नाचवित असतो. तो हा अहंकार म्हणजेच आपल्या सांप्रत अवस्थेचे मूळ होय. याचा लय शुद्ध जाणिवेत (Pure consciousness) झाला की आत्मदर्शन होते. म्हणजेच स्वतःचे शुद्ध व सत्य स्वरुप समजून येते. त्यामुळेच या स्थितीला 'जीव शिव ऐक्य' असे म्हणतात.

या अहंकारा बाबत 'बाबांना उलटे टांगले त्याची गोष्ट' या लेखात त्रोटक प्रमाणात लिहिले आहेच. हा अहंकारच बाबांच्या सत्य स्वरुपाशी भेट होण्यास आडकाठी ठरत असल्याने त्याला भिंत असे बाबा म्हणाले असावेत. ही अहंकाररुपी भिंत पाडली म्हणजेच आपल्याला साईंच्या सत्य स्वरुपाशी तदात्म्य साधता येईल. म्हणून हा अहंकार म्हणजे काय? साईंशी भेट घडण्यात त्याची कशी आडकाठी होते. याची थोडीशी विस्तृत चर्चा करण्याचे या ठिकाणी योजिले आहे.

अर्थात श्री समर्थ साईंशी आंतरीक पातळीवर तदात्म्य पावण्यासाठी प्रथम साईबाबा निश्चितपणे कोठे आहेत हे प्रथम पाहिले पाहिजे.

वाचकहो, तुम्ही श्रीसाईंची जी प्रार्थना करता ती मनातल्या मनात करीत असल्याने ती तुम्हाला स्वतःला व आजूबाजूच्या लोकांनाही ऐकू येत नाही. परंतु साईबाबांना मात्र ती झटकन ज्ञात होते. यावरून साईंचे हे आपल्या निकट असलेले अस्तित्व आपल्या मनातील प्रार्थनेच्या विचारापेक्षा देखील सूक्ष्म असले पाहिजे. किंबहुना ते आपल्या मनाच्या अत्यंत निकट असे कुठेतरी असले पाहिजे. नाहीतर आपली प्रार्थना साईंना कशी बरी ज्ञात होऊ शकेल? म्हणून त्यांचे खरे अस्तित्व कोठे आहे याचे मार्गदर्शन श्रीसाईंनी स्वतःच केले आहे. ते बाबांचे शब्द लक्षात घेतले तर श्रीसाईंचे हे अस्तित्व निश्चित कुठे आहे ते आपणास समजून येईल.—

> म्हणाल आता मी आहे कोठे?
> आता मी तुम्हा कैसा भेटे।
> तरी तुमचिया हृदयीच तिष्टे।
> विनाकष्टे सन्निकट ॥ १६२ ॥ अ. ४४

यावरून मी तुमच्या हृदयातच असल्याने तुमच्या अगदीच सन्निकट असून, माझी शोधाशोध अन्यत्र करण्याची गरजच नाही, असे समर्थ स्वतःच अभिवचन देत आहेत.

श्रीसाईसमर्थांसारखे किंवा माझे परमपूज्य दैवत श्रीसमर्थ भालचंद्रमहाराजासारखे शुद्ध ब्रह्माशी तदात्म्य पावलेल्या विभूती या जगात क्वचितच आढळून येतात. त्यामुळे ते प्रत्येकांच्या अंतरातच काय परंतु त्रिखंडातही भरून उरलेले असतात. त्यांचे हे आपल्या अंतरीचे स्वरूप म्हणजेच आपल्या देहांतर्गत असणारा आत्मा किंवा शिव होय. यालाच भक्तीमार्गी संतांनी विठोबा, पांडुरंग वगैरे म्हटले आहे. म्हणून खऱ्या आर्त भक्तांना बाबा सांगतात–तुम्हाला जर मला जाणावयाचे असेल तर, तुम्ही आत्मस्वरूप आहात याची प्रथम ओळख करून घ्या. म्हणजे मला जाणून घ्यावयाचे किंवा माझ्याशी एकरूप होण्याचे काहीच शिल्लक रहाणार नाही हीच गोष्ट साईसत्‌चरित् कसे सांगते ते पहा.

म्हणाल हृदयस्थ कैसा कोण ।
कैसे काय त्याचे लक्षण ।
ऐसी काय त्याची खूण ।
जेणे त्या आपणा जाणावे ॥ १६३ ॥ अ. ४४

म्हणून आधी आपला खराखुरा पत्ता सांगून त्या पत्त्यावर कसे पोहचायचे याची गुरुकिल्ली देखील बाबा या उक्तीने देत आहेत. तर सपटणेकरांच्या मिषाने त्या पत्त्यावर पोहचण्यातील अडचण दाखवीत आहेत. म्हणून बाबांच्या ठिकाणी पोहचण्यात जी अडचण आहे ती आता आपण जाणून घेऊ या.

या अहंकाराची ओळख मागील लेखामध्ये झालेली असल्याने त्याला वेगवेगळ्या नावाने कसे संबोधतात ते सांगितले म्हणजे त्याचा अर्थ व स्वरूप अधिक स्पष्ट होईल. या अहंकारास (Ego), त्याच्या निरनिराळ्या प्रकारच्या क्रियाशीलतेवरून विद्वानांनी त्याला वेगवेगळ्या शब्दात शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात या शब्दावरून त्याचे कार्य देखील स्पष्ट होईल.

१. अहंकृती : शुद्धी जाणिवेतून (Pure Consciousness) निर्माण होणारी 'मी' आहे ही मूळ भावना म्हणजे अहंकृति होय. समजा मी आहे असे काही वाटलेच नाही (म्हणजे भिंत गेली) तर पुढे काहीच भावना निर्माण होणार नाहीत. मग फक्त शुद्धा स्वरूपच उरेल नाही का ?

२. हृदयग्रंथी : या शब्दाने अहंकाराची दोन कार्ये स्पष्ट होतात. एक म्हणजे आत्म्यास झांकून टाकणे व दुसरे म्हणजे अन्य प्रकारे व्यक्त होत राहणे ही ती कार्ये होत.

गोष्टी ते स्वीकारते. नको त्या दूर सारते. उदा. समजा एकादे पुस्तक वाचण्यात आपण रंगतो. बाजूलाच माणसे बोलत असतात परंतु त्या गोष्टी आपण ऐकत नाही. कारण मनाला पुस्तक हवे असते तेच त्याने स्विकारलेले असते. बोलण्यातले शब्द त्याला नको असतात त्याचा स्वीकार ते करीत नाही. अशा रीतीने जगापैकी फक्त आपल्या आवडीचाच भाग मन साकार करण्याचा प्रयत्न करीत असते.

किंवा प्रत्यक्षात तीव्र इच्छा अपुऱ्या असतात. तेव्हा त्याचीच स्वप्ने झोपेत पडतात. अशा रितीने अंतर्मनाच्या सहाय्याने मन आपली स्वतःची अशी, आपल्याला हवी तेवढीच जग निर्मिती मन आपल्यात असणाऱ्या कल्पनेच्या शक्तीद्वारे साकार करीत असते. म्हणून मनच जगोत्पतीचे कारण आहे असे उपनिषदे व संत म्हणत असतात.

अशा रितीने अहंकारातून बुद्धी, बुद्धीतून मन, मनातून अंतःकरण, अंतःकरणातून देहभाव, देहभावातून दुजाभाव, (आपपर भाव) दुजाभावातून जग व जगापासून सुख-दुःख, प्रेम, राग, प्रिती, द्वेष, आशा-निराशा अशा उलट व सुलट द्वयींची निर्मिती होते व ह्या जोडीतील एकाशी गाठ पडताच सुख वा दुःखाची कल्पना पुन्हा मनच साकार करते व स्वस्वरुप विसरते. ह्या गोष्टीचा बोध उपनिषदप्रणीत तत्वज्ञानावर आधारलेल्या श्रीसाईसत्‌चरितातून कसा येतो.—

अविद्या प्रसवे देह बुद्धी ।
देह बुद्धी आधी व्याधी ।
तीच की लोटी विधिनिषेधी ।
आत्मसिद्धी विघातक ॥ १६१ ॥ अ. ४४

या वरून अहंकारामुळे निर्माण होणारी जी अविद्या म्हणजे मी कोणी आहे हे अज्ञात इतर कटकटी निर्माण करते, व स्वरुपाचा विसर पाडते, हे सिद्ध होते. म्हणून अहंकार जर वगळला तर पुढील रामायण कसे घडेल ? म्हणून तर संत म्हणतात—

अहंकाराचा वारा न लागो राजसा

—संत नामदेव

या वरून नामदेव महाराजांचे म्हणणे देखील शुद्ध जाणिवेस (Pure consciousness) अहंकाराचा (Ego) वारा सुद्धा लागता नये असे वाटते. तर बाबा त्याच अहंकाराचा नाश करण्याचा उपदेश भिंतीचे रुपक सांगून करतात. कारणः—

३. विबंध : स्वतःमधून मन बुद्धी शरीर ( देहभाव ) निर्माण करून त्या द्वारे माया मोह राग द्वेष मत्सर प्रेम इत्यादी स्वतःच निर्माण केलेल्या विकाराद्वारे जगाशीं चिकटून रहाणे व त्यामुळे बंधनात पडणे म्हणजेच विबंध होय.

४. सूक्ष्म शरीर : स्वतःमधून मन बुद्धी अंतःकरण इत्यादी मानसिक व्यक्तिमत्व ( Mental Entity ) तयार करून त्यावर व शरीरावर अबाधित सत्ता चालविणे.

५. चेतस : मनामध्ये निरनिराळ्या प्रकारच्या भावना वा कल्पना निर्माण करणे.

६. भव किंवा संसार सागर : स्वतःमधून मन तयार करून त्या मनामध्ये जगाच्या अस्तित्वाविषयी धारणा निर्माण करणे.

७. जीव : मी अमूक नावाचा माणूस आहे. माझे घर, माझी नोकरी, माझी पत्नी इत्यादी गोष्टीत जीवभाव ( देहभाव ) धारण करून समरस होऊन त्यापासून सुख किंवा दुःख भोगणे.

आता अहंकाराच्या कार्यांचे विश्लेषण करू या म्हणजे हा अहंकार आपल्या नित्य जीवनात कसा प्रत्ययास येतो ते जाणवेल.

प्रथम शुद्ध जाणिवेतून हा अहंकार उत्पन्न होऊन प्रथम 'मी' आहे अशी जाणीव निर्माण करतो. या मीमधून माझे मन माझे शरीर अशा भावना निर्माण होतात याला देह भाव किंवा जीवभाव असे अध्यात्मिक परीभाषेत संबोधतात. मी नसेल तर माझा माझी वगैरे निघणारच कोठून !

या अहंकारातून प्रथम बुद्धी मन शरीर व त्यानंतर जग या क्रमाने निर्मिती होते. आता या अहंकारातूनच मन निर्माण होत असल्याने मन जगाची निर्मिती करीत असते कसे ते पहा.

समजा एकाद्या उंच बांधलेल्या दोरीवरून चाललेला डोंबारी पडेल की काय अशी आपणाला भिती वाटते ? मग आपण भीतीने डोळे बंद करून घेतो किंवा एकादे अपघाताचे दृश्य पाहून आपण भीतीने डोळे मिटून घेतो. याचा अर्थ मनास जी गोष्ट आपणास नको असे वाटते ती गोष्ट ते ज्ञानेंद्रियांना आज्ञा करून टाळते. म्हणजे मनाच्या दृष्टीने जगातल्या त्या गोष्टीचे अस्तित्व नसते. उलटपक्षी आवडल्या

क्रमांक दोनच्या 'हृदय ग्रंथी' मध्ये म्हटल्यानुसार शुद्ध जाणिवेस झाकून ठेवण्याचे व स्वतः दिव्यत्वाचा अंश असून देखील अन्य प्रकारे (देहभाव इ.) व्यक्त होण्याचे कार्य अहंकार करतो. त्यापैकी आपणास दुसरे कार्य नित्य अनुभवास येत असते. म्हणजे ज्यावेळी आपण गाढ निद्रेत असतो. त्यावेळी आपण स्वताचे शरीर आजूबाजूचे जग स्वतःच्या सर्व समस्या वगैरे गोष्टी पूर्णपणे विसरतो. म्हणजे आपल्या दृष्टीने जग वा शरीर त्याचप्रमाणे भावना कल्पना इत्यादी अस्तित्वात नसतात. कारण या सर्वांचे जे मूळ तो अहंकार यावेळी सुप्तावस्थेमध्ये असतो. म्हणजेच कार्यरत नसतो. म्हणून अहंकार जागृत असे पर्यंतच मनाची उत्पत्ती होते. म्हणजेच पर्यायाने जगाची उत्पत्ती होते. म्हणूनच आत्मभावारुढ सत्पुरुषांच्या अहंकाराचा लोप शुद्ध जाणिवेत झालेला असल्याने त्यांना उन्मनी स्थिती प्राप्त होऊन जगाची प्रतिती येत नाही. म्हणून जग हा भ्रम आहे असे विधान उपनीषदे करतात. या अहंकाराच्या कार्यास अध्यात्मिक परीभाषेत 'विक्षेप' असे म्हणतात. असो—

परंतु केवळ अहंकारास सुप्त अवस्था आली तरी त्यामुळे आत्म साक्षात्कार पात्र होत नाही. कारण 'हृदय ग्रंथी' मध्ये सांगितलेले प्रथम कारण होय. हे कार्य म्हणजे आत्म्याला झाकून टाकणे (veiling) होय. याला अध्यात्मिक परीभाषेत 'आवरण' असे संबोधतात. म्हणूनच अहंकाराचा पूर्ण नाश जेथून तो उत्पन्न झाला त्या मूळ स्वरुपात पुन्हा विलीन झाल्या खेरीज आत्मदर्शन होत नाही. त्यामुळेच संत या अहंकाराचा नाश करण्याचा उपदेश सतत वर्षानुवर्षे करीत आहेत.

अर्थात गाढ निद्रेमध्ये असताना या अहंकाराचे 'आवरणाचे' कार्य सुरु असल्याने ती स्थिती आत्म साक्षात्काराची नसते. कारण पुन्हा जागे झाल्यावर अहंकाराचे विक्षेपाचे कार्य सुरू होते. म्हणजे पुन्हा 'येरे माझ्या मागल्या' अशी स्थिती होते. म्हणूनच अहंकाराचा नाश ही गोष्ट अत्यंतिक महत्वाची ठरते.

या अहंकारामुळेच देह बुद्धीचा निश्चय दृढ होतो, व आत्म स्वरुप विसरले गेले म्हणून संत सांगतातः—

देह बुद्धीचा निश्चयी दृढ झाला।
देहातीत ते हित सांडोनी गेला॥

म्हणून संत पुढे म्हणतात.

देह बुद्धी ते आत्मबुद्धी करावी।

किंवा

मन बुद्धी अहंपण आत्मारामी समर्पुन ।

म्हणून अहंकाराचा त्याग करून ज्ञानाच्या योगाने देह बुध्दीचा त्याग करून आत्मस्वरुप शोधा व अंतरातील सत्य वस्तू म्हणजे आत्मा, तोच साई, तोच परमेश्वर तोच पांडुरंग किंवा त्या स्थितीप्रत पोहचलेले सारे सत्पुरुष, ते स्वतः आपणच आहोत हे ओळखा हाच उपदेश रामदासस्वामी मनाचे श्लोका मधून करतात.

देह बुध्दी ते ज्ञानबोधे त्यजावी ।
विवेके तया वस्तूची भेट घ्यावी ।
तदाकार हे वृत्ति नाही स्वभावे ।
म्हणोनी सदा तेचि शोधित जावे । मनाचे श्लोक ॥ १७० ॥

वरील विवेचनावरून व साईबाबांनी सांगितलेल्या सत्यवचनावरून श्रीसाई आपल्या अंतरीच आत्मरुपाने नांदत आहे. त्यांचा बाह्य जगातील शोध म्हणजे उलट दिशेने केलेला प्रवास असल्याने तुम्ही इच्छीत स्थळी (destiny) न पोहचता भरकटत जाल म्हणून अंतरीच्या साई व आपल्या मधील भिंत पाडून झाली की खऱ्या खुऱ्या साईची अगदी सन्निकट भेट होईल, व खरा आनंद (Pure Bliss) प्राप्त होईल. तो चिरकाळ टिकणारा असेल.

म्हणून साईरुपी सद्‌गुरूंकडे आपण लौकीक सुखे न मागता, त्यांच्याचकडे पोहचण्यासाठी त्यांच्या व आपल्यामधील अहंकाराची भिंत पाडण्याच्या प्रयत्नास आजपासूनच लागू या आणि जर इतर सुखे प्राप्त करुन देणारा साईभगवानच जर प्राप्त झाला तर आनंदाला तरी काय तोटा ? तसा व्यवहार म्हणजे अर्जुनाने कृष्णाचे सैन्य न मागता स्वतः कृष्णालाच मागीतल्या प्रमाणे चतूर व्यवहार ठरेल हे काय सांगायला हवे ?

म्हणून सपटणेकरांच्या मिषाने अचूक मार्गदर्शन करणाऱ्या परम सद्‌गुरु श्री साईबाबांना त्रिवार वंदन करून म्हणतो—

ॐ नमो भगवते श्रीसाईनाथाय

१८

# श्रीदत्तगुरूंचे चोवीस गुरू

—श्री. आल्हाद कावाडी
३ फाल्गुनी, सरोजिनी रोड,
सांताक्रूझ, मुंबई

'जो जो जयाचा घेतला गुण। तो तो म्या गुरू केला जाण।
गुरूंसी आले अपारपण। जग संपूर्ण गुरु दिसे॥
ज्याचा गुण घेतला। तो सहजे गुरुत्वा आला।
ज्याचा गुण त्यागरूपे घेतला। तोहि गुरू झाला अहित त्यागे॥'

'आदिगुरु', 'विश्वगुरु' अशा गौरवपर शब्दात ज्यांचा उल्लेख होतो त्या प्रभु दत्तात्रेयाने पुढील चोवीस गुरू कशासाठी केले? प्रत्येक गुरुपासून त्यांनी कोणता गुण घेतला?

| गुरु | त्यापासून काय शिकले? |
|---|---|
| १. पृथ्वी : | क्षमा, शांति हे गुण शिकले. |
| २. वायू : | अनासक्ती व निर्लेपता. |
| ३. आकाश : | निर्मळता, समता, असंगता व अभेदता. |
| ४. पाणी : | स्वच्छता आणि समानता. |
| ५. अग्नी : | प्रकाश व असंगता. |
| ६. चंद्र : | देहावर विकार निर्माण झाले तरी आत्मा सदैव अविकारी असतो हे शिकले. |
| ७. सूर्य : | परोपकार व अलिप्तता. |
| ८. कपोत युगुल : | अतिप्रेम व आसक्ती विनाशास कारणीभूत होतात. |
| ९. अजगर : | अकारण धडपड न करता स्वस्थ चित्त असावे. |
| १०. समुद्र : | गंभीरपणा व मर्यादशीलता. |
| ११. पतंग : | भुलून दीपावर झडप घातली तर आत्मनाश होतो. |
| १२. मधमाशी : | अतिसंग्रही वृत्ती विनाशास कारण ठरते. |


| गुरु | त्यापासून काय शिकले? |
|---|---|
| १३. हत्ती : | हत्तिणीमुळे बेसावध होणारा हत्ती संकटात सापडून गुलाम होतो, म्हणून स्त्रीसंगाचा त्याग. |
| १४. भ्रमर : | कुणासही न दुखावता आपला लाभ करून घ्यावा. |
| १५. हरीण : | सावधपण, कारण नादलुब्ध होऊन घात होतो. |
| १६. मासा : | गळाला लावलेल्या आमिषाला भुलू नये. |
| १७. पिंगला वेश्या : | आशायुक्त वृत्तीमुळे सुख व निद्रा मिळत नाही म्हणून स्वावलंबनाने स्वतःचा उद्धार करावा. |
| १८. टिटवी : | अकारण हातचे राखून ठेवण्याची धडपड केल्यास अखेर नाश होतो. |
| १९. बालक : | मानापमान व चिंता त्यागावी. |
| २०. कुमारी : | एकान्तवास श्रेयस्कर असतो. |
| २१. सर्प : | एकाकी राहाणी व सावध चित्त. |
| ५२. लोहार : | कामात संपूर्ण एकाग्रता. |
| २३. भिंगुरटी : | भिंगुरटीचा शत्रू भ्रमर. म्हणून भिंगुरटी ( कीटक ) त्याचे इतके तीव्रतेने ध्यान करतो की, तोच भ्रमर होऊन जातो. |
| २४. कोळी : | विस्तार, निर्मिती, संहार हे सर्व अद्वैत आहे. हे एकतत्व कोळ्यापासून शिकले. |

या सर्व गुरूंकडून दत्तगुरूंनी गुण घेतला आणि आपले पूर्णत्व विश्वसंचार करीत सर्वांच्या कल्याणासाठी उपयोगात आणले. अशा तऱ्हेने चोवीस गुरूंचे प्रेम त्यांनी संपादन केले. 'प्रेम समता वाढवा रे । अवधूत झेंडा मिरवा रे ॥'

आपण यावरून हाच बोध घ्यायचा की, गुरूकृपा असणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी श्रीदत्तगुरूंचे नामस्मरण, श्रीगुरूचरित्राचे पारायण व सद्‌गुरूंवर नितांत श्रद्धा आवश्यक आहे. अर्जुनाची, एकलव्याची दृढ निष्ठा अंगी बाणवली पाहिजे. श्रद्धा आणि विश्वासातून गुरुकृपा प्राप्त केली पाहिजे. गुरू–गिरंति अज्ञान इति । म्हणजे 'जो अज्ञान दूर करतो तो' श्रीजगद्‌गुरू शंकराचार्यांनी सद्‌गुरू महिमा सांगतांना असे स्पष्ट म्हटले आहे की, 'ज्ञान देणारे, इतकेच नव्हे तर आपल्या प्रमाणेच परब्रह्म स्वरुप शिष्याला करणारे जे सद्‌गुरू आहेत त्यांना तुल्यबळ असा दुसरा दृष्टांत नाही.' तेव्हा मार्गशीर्ष पौर्णिमेला दत्तजयंतीच्या शुभसमयी आपण भजन करू या. 'भज मना गुरुवरा श्रीदत्ता । भज मना गुरुवरा अवधूता ॥' 卐

# संत द्वय

—श्री. मधुसूदन वामन करंबेळकर
रघुनाथ निवास चेंबूर गावठाण मुंबई ७१

卐  卐

कै. श्री. काकामहाराज पुराणिक धोपेश्वरकर

जन्म—कार्तिक वद्य १३ शके १७४३          देहविसर्जन—कार्तिक शु. १ शके १८३२

● संत महात्मे देहाने भिन्न दिसतात. क्वचित प्रसंगी त्यांचे वागण्यातही फरक दिसून येतो परंतु अंतर्यामी ते एक रुपच असतात. जगाचे कोट कल्याणव्हावे हाच त्यांचा मुख्य हेतू असतो. 'धोपेश्वरचे श्रीकाका महाराज पुराणिक व शिर्डीचे श्रीसाईबाबा' हे एक रुपच होते. श्रीसाईभक्तांना श्रीकाका महाराज साईरुप दिसलेले आहेत तर श्री काकांचे भक्तांना श्रीसाई महाराज काका स्वरुपात दिसले. अशीच एक गंमत श्री काका महाराज यांचे चरीत्रांतील देत आहे. श्री. कै. नेनेशास्त्री यांनी केलेल्या आर्याच मुद्दाम लिहित आहे. एका कुटुंबात पाच भाऊ होते त्यांची माहीती खालील प्रमाणे.

हे बंधू पंचक असे पूर्ण सुशिक्षित सुशीलही भारी ।
त्यांतिल काही पदवीधर सरकारीहि असति अधिकारी ॥ १ ॥

जेष्ठ असे न्यायासनिं पंढरपुरि तो असे सरळ फार ।
जळगावचा दुजा त्या समयि असे तेथ मामलतदार ॥ २ ॥

तिसरा चवथा असती व्यापारी नेत्र शस्त्र वेधे असे ।
पंचम, पदवी त्याला विलायतेतील थोर लाभतसे ॥ ३ ॥



जेष्ठ भ्रात्यास तनय दोन असति अति हुशार एक असे ।
पदवीधर वैद्य दुजा शिक्षण शाळेत उच्च मिळवितसे ॥ ४ ॥

यांतिल दोन जणांना भक्ति असे कामने रहित जडली ।
एक महात्म्यावर अति असे जयाची जनी प्रसिद्धी भली ॥ ५ ॥

म्हणति महात्म्याला या साई महाराज साईबाबा वा ।
वसति स्थान करी हा नगर प्रांतस्थ शेरडी गांवा ॥ ६ ॥

हा यवन सिद्ध राही तिथल्या मशिदीमधे कितीक तपे ।
न कळे हे मात्र खरे की कंठी काल तो स्वगुप्त तपें ॥ ७ ॥

यवन असुन रामाचा जन्मोत्सव तो मशीदीमाजी करी ।
तरि यवनांचीही त्या वरिल असे पूज्य बुध्दी बहु जबरी ॥ ८ ॥

यवनाहुनीही आहे हिंदुची जास्त, त्यातल्या त्यात ।
अलिकडले पदवीधरही काही भजति त्या अतोनात ॥ ९ ॥

ऐशा सुशिक्षितांची संख्या आहे महा तिच्यांतील ।
काही अपुले धंदे सोडून त्या स्थानि बसति सच्छील ॥ १० ॥

कायमचे साईमहाराज पदांची सदा करित सेवा ।
हा त्यांच्या पुण्याचा असे खरोखरच थोर बहु ठेवा ॥ ११ ॥

जन दूर दूरचेही येति सदा दर्शनास बाबांचे ।
त्या आडगावि तेव्हा होत असति हाल त्या समस्तांचे ॥ १२ ॥

म्हणुनी तेथे त्याचे अनुयायी सोय करिति टांग्यांची ।
तैसी येत्या जात्या जेवणही आयते मिळायाची ॥ १३ ॥

दर्शन समयी साईबाबाला लोक देत असति धन ।
त्यासाठी कोश सदन तेथे करिती तयार भक्तजन ॥ १४ ॥

धनिक महा भक्तांनी बाबांचे ते रहायचे स्थान ।
आता केले आहे जणु टोलेजंग एक संस्थान ॥ १५ ॥

बाबा वृद्ध असूनी होती तद्वृत्तिचे बहुत रंग ।
सानंद कधी तर तो देण्यात शिव्या कधी असे दंग ॥ १६ ॥

हा अंतर्निष्ठ असे थोर अवलिया म्हणून सर्वज्ञ ।
आहे ऐसा अनुभव घेती कित्येकजन तिथे प्रज्ञ ॥ १७ ॥

पूर्वोक्त बंधू मधला जेष्ठ असे थोर भक्त बाबांचा ।
बाबांचा भक्त दुजा निस्सीम असे कनिष्ठ सुत त्याचा ॥ १८ ॥

हा पुत्र बाळगी निज मनगटि तसबीर साईबाबांची ।
अगदी सान म्हणूनी दृष्टी पडे तिजवरी सदा त्याची ॥ १९ ॥

बाळगल्याविण मनगटि ही तसबीर न तयास चैन पडे ।
प्रेमाश्रुपात होई तन्नयांतून बघुन तीजकडे ॥ २० ॥

ऐसा जेष्ठ भ्राता एक सुतासह असे जरी भक्त ।
बाबांचा, तरि तुजला ( म्हणजे काकांवर ) ईश्वर मानुन असेत्वदासक्त ॥ २१ ॥

इतर कुटुंबातील या यद्यपि असती त्वदीय अनुयायी ।
अतिपूज्य बुध्दी आहे त्यांची त्या थोर साईचे ठायी ॥ २२ ॥

कारणभूत तयाला होई मल्कापुरस्थ भक्त तव ।
जो तनमित्र असूनी सांगे त्या वृत्त तव तवानुभव ॥ २३ ॥

तेणे तुजवर त्यांची जडे विमल भक्तिपण तुझ्या पायीं ।
त्या दोघांविण सारे घरुनि शिरे जाहले त्वदनुयायी ॥ २४ ॥

म्हणुनी पांचानीही त्या तुला प्रार्थिले मनोभावे ।
की आम्हा बंधूंच्या प्रत्येक घरास पाय लागावे ॥ २५ ॥

अपुले पवित्र, घडता हे आम्ही होऊ खचित कृतकार्य ।
नाकारणे विनतिही, तुजला वाटे, असे अपरिहार्य ॥ २६ ॥

तूं मान्य विनति त्यांची केल्याचे कळविल्यावरी त्यांना ।
जेष्ठ भ्राता धाडी स्वानुज तूं सांझू गेहिं असताना ॥ २७ ॥

मुद्दामच तूजकडे तुजला प्रार्थून बोलवायाला ।
पंढरपुरा सवडिने पवित्र घर आपुले करायाला ॥ २८ ॥

स्वीकारिसी निमंत्रण त्याचे अट एक त्यास घालूनी ।
दिन एक म्हणसी राहिन तुमच्या घरिं सांगतो बजावुनी ॥ २९ ॥

वरीलप्रमाणे श्री काकामहाराज यांनी एकच दिवस पंढरपुरला राहीन ही अट घातली होती. श्री काकामहाराज एक दिवसांवर जास्त रहाण्यास सहसा तयार नसत. वरील भक्तांची श्री साईवर व श्रीकाकांवर पूर्ण श्रद्धा होती. श्री साई हे अग्नि-होत्री असल्यामुळे शिर्डी सोडून जात नव्हते. म्हणून निदान श्री काकांचे तरी चरण पंढरपूरला आपले जागी लागावेत ही त्यांची इच्छा होती. त्याने श्रीसमर्थ साईंचे कानावरही ही गोष्ट घातली त्यावेळी श्रीसाईमहाराज खालीलप्रमाणे म्हणाले—

पण योग येइना तो त्वरित म्हणुन, एक समयिं असतांना ।
शेरडीला स्वोत्कंठा ही तो करि विदित साईबाबांना ॥

त्यावर बाबा बोले का तू चिंता करीसि हटकून ।
श्रीकाका तुज दर्शन देतील तुझ्या घरास येऊन ॥

इतुकेच न तर रात्री तीन रहातील तव गृहीं खास ।
ते म्हणुनी थोडीही तुजला चिंता नको करायास ॥

श्री काकामहाराज यांनी पूर्वी एकच दिवस राहीन ही अट घातली होती ...माणे पंढरपूरला ही गोष्ट वारंवार बोलून दाखविली. परंतु श्रीसाईमहाराज ह्यांचे

शब्दाप्रमाणे त्यांनी तीन दिवस मुक्काम केला. अशाच एक प्रसंगी श्री काकामहाराज यांनी आपणाकरिता आणलेला हार तेथील श्री साईबाबा यांचे तसबिरीला घातला. संत देहाने भिन्न दिसले तरी ते एकरुपच असतात हेच यावरून सिद्ध होते.

# एका सत्य घटनेवर विचारमंथन

—श्री. वसंत वामन प्रधान
श्री. गणाधीराज को. ऑ. हाऊसिंग
सोसायटी लि. बि. नं. २, ब्लॉक नं. ९२
मिठागर रोड, मुलुंड ( पूर्व ) मुंबई ८१

● माझ्या जीवनातील गेली चाळीस वर्षे शिरडीच्या वाटचालीत आहेत जवळ जवळ सबंध गावच माझ्या परिचयाचे, व जीवनाशी इतके निगडीत झाले की श्रींच्या मंदीरासह तेथील प्रत्येक गोष्ट माझ्या जिव्हाळ्याचा भाग बनले आहे. माझे वडील श्री बाबांच्या त्याकाळी सहवासात आले होते; म्हणून बालवयापासूनच मला आज सत्तरीत सुद्धा शिरडी हे जीवनाचे सर्वस्व वाटत आहे. माझे कवी मन नेहमीच कुठल्याना कुठल्या वेड्याचेच विचार करते. जगात शहाणे सर्वच पण वेडे दुर्मीळ. असाच एखादा वेडा स्वतःशीच मशगूल असणारा व जगाकडे पाहून स्वतःशीच हसणारा, जणूकाही सर्व जग वेडे असावे असे वाटणारा. इतक्या विस्तृत प्रस्तावनेत सांगण्यासारखे मला विचाराला चालना देणारे व अंतर्मूख करणारा एक वेडा माझ्या प्रीय शिरडीतच मला भेटला व इतर सर्व लोकाजवळ जसा मी सुखसंवाद करीत असे तसेच त्याच्याजवळ बोलत असे. एकदा तो मला असाच नेहमीप्रमाणे श्रींच्या समाधी मंदीरात भेटला व सुहास्य मुद्रेने राम राम साहेब कधी आला ? व मीही त्याला आत्ताच आलो म्हटले, त्यावर तो जसा एखादा जवळचा नातेवाईक भेटावा त्याप्रमाणे म्हणाला साहेब तुम्हाला पाहिले म्हणजे फार बरे वाटते. आता जुनी माणसे फारशी दिसत नाहीत सगळे नवे नवे लोक ( त्याच्या दृष्टीने नवे विचारांचे ) बाकी आपल्याला काय म्हणा श्रींच्या मूर्तीकडे बोट दाखवून हे आपले मायबाप व आपला रोजगारीचा धंदा ( पाणक्याचा ) कशाची चिंता नाही कशाची फिकीर नाही. असा हा उद्याचा विचार न करणारा वेडा. लोकांच्या दृष्टीने आम्ही उभ्या उभ्याच संवाद करीत होतो. इतक्यात

संभाषणाच्या ओघात त्याने मला एक हकीगत सांगितली ती अशी, एक सुविद्य गृहस्थ असाध्य आजारात श्रींच्या समाधी दर्शनास आले. ते बहुधा शेवटचे दर्शन घेत असता एका एकी जास्त अस्वस्थ वाटल्यामुळे आपल्या शिरडीतील निवास स्थानाकडे गेले व लगेच त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. पुढे त्याने (वेड्याने) स्वतःचा अभिप्राय व्यक्त केला तो असा—काय माणूस श्रींच्या चरणी देह ठेवण्याची आलेली संधी त्याने गमावली; घटकाभर इथेच थांबला असता तर! हे त्याचे शब्द एका खेडवळ माणसाचे शिक्षण नसणारे आध्यात्मिकाचा गंध नसणारे एवढे तत्वज्ञान जाणू शकतो. बाकी पुस्तकी पांडित्य आपण पुष्कळ ऐकतो. अशा जाणकाराला गावातील लोक वेडा समजतात. या जगात शहाण्याला लोक वेडा म्हणतात कारण तो विक्षीप्तपणाने वागतो. जगाच्या दृष्टीने वाटणारा वेडा अलिप्तपणाने राहतो कारण शहाण्यांचे परमार्थीक अज्ञान त्याला उमगलेले असते. ती व्यक्ती गबाळी वेषाची पण शोधक दृष्टीची रहाणी संबंधीचे विचार वेगळे शाश्वत मूल्यांचे विचार करणारे काहीसे आत्मकेंद्रीत, दैव वशात प्राप्त झालेले कनिष्ठ जीवन सुद्धा हसतमुखाने व प्रसन्न चित्ताने स्वीकारणारे परमेश्वरावर नितांत श्रद्धा व जीवनाची क्षणभंगुरता मनात बाणलेले असे लोभस, प्रेमळ, निर्व्याज, व्यक्तीमत्व असणारा पाणक्या जगाने त्याज्य ठरविलेला माझ्या मनात संपूर्ण ठसला आहे. अजूनही माझी दृष्टी त्याला धुंडीत असते. कुणाचा कोण एक सामान्य माणूस कालाच्या उदरात गेलाही असेल, त्याची कुणाला खंत नसल्या मुळे त्याचे लौकीक जीवन विस्मृतीत गडप झाले पण त्याने माझ्या मनात पोकळी निर्माण केली. का कुणास ठाऊक ना त्याचा जीवन परिचय ना त्याचा कौटुंबीक परिचय तरीही मन त्याला विसरत नाही. एखाद्या बालाचे निरागस निष्पाप मन असणारा पाणक्या त्याला परमेश्वर कसा विसरेल? कारण त्याला परमेश्वराच्या खऱ्या स्वरुपाचे ज्ञान होते व त्याप्रमाणे तो वागत होता. म्हणून जगाच्या दृष्टीने तो वेडा; व तो मला एकदा तरी दिसावा त्याचे वेड फार जवळून पाहवे ही उत्कंठा कशी पुरीं होईल? मी जेव्हा जेव्हा शिरडीला जातो तेव्हा तो कुठे दिसतो का म्हणून पाहतो. एका वेड्याच्या शोधात असलेले माझे मन वेडेच नव्हे काय? 卐

# साईनाथांची कर्मयोगाची शिकवण

● एकोणीसशे शेहचाळीसच्या मे महिन्याची एक संध्याकाळ शिरडीच्या हवेतील उष्णता बरीच कमी झाली होती वाऱ्याचा सुखद स्पर्श व्हावा म्हणून मी व माझा गुरुबंधू सहज सडकेवर फिरत होतो, मनात श्रीसाईबाबांच्या स्मृतीचे विचार चालू होते गावातील कुणी एखादा वृद्ध नजरेस पडतो का म्हणून चौफेर बघत होतो इतक्यात एक मुसलमान वृद्ध गृहस्थ रस्त्याच्या कडेला एका दगडावर बसून विडीचा

झुरका घेत होतां. आम्ही मोठ्या आशेने त्याचे जवळ गेलो व विचारले तुम्ही शिरडी, तलेच का ? त्याने होय म्हटल्यावर मी त्याला विचारले तुम्ही बाबाना पाहिले आहे काय ? असल्यास त्यांची एखादी आठवण सांगा. त्यांवर तो गृहस्थ जरा सावरून बसला व म्हणाला होय मी त्यांचेबरोबर चिलीम ओढली आहे. त्यांच्या अगदी जवळ बसून त्यांचे बोलणे ऐकत असे. त्यांची बोलण्याची पद्धत थोडी वेगळी होती, ज्या एखाद्या व्यक्ती संबंधी बोलावयाचे असेल ते बोलणे ते दुसऱ्या माणसा जवळ बोलत; त्यामुळे तो ऐकणारा माणूस बुचकळ्यात पडत असे व ज्याचे संबंधी ते बोल असत ती व्यक्ती बाबांचे बोल ऐकून खूण पटल्यामुळे समग्र एकाग्रतेने ऐकत असे व बोलणे संपल्यावर श्रींचे चरणी मस्तक ठेवीत असे. बाबा रोज काही लोकाना पैसे देत, दहा, पंधरा, पंचवीस, पन्नास, सुद्धा रुपये देत असत. परंतु मला मात्र त्यानी एक पैसा सुद्धा दिला नाही, माझी परिस्थिती फारच गरीबीची होती. माझे एकच शेत होते. त्यावर कशीबशी गुजराण करीत असू. एकदा मी बाबांना म्हटले बाबा तुम्ही इतक्या लोकाना रुपये देता मला गरीबाला काहीच देत नाही त्यावर बाबा बोलले अरे तुला कशाला पैसे तुझ्या शेतात तर सोन्याचे हंडे आहेत. बाबांचे बोल नेहमी खरे होत व आमची सर्वांची तशी श्रध्दा होती. त्यांच्या सांगण्याबाहेर आम्ही कधी वागत नव्हतो. मला वाटले आपल्या शेतात सोन्याचा हंडा असेल म्हणून मी शेत नांगरते वेळी फार कसून नांगरीत असे व शेताची मशागत करीत असे; अर्थात हे सर्व करताना मनामध्ये केवळ बाबा व त्यांची वाणी इतक्याच गोष्टी असत. शरीर कामाला व मनदेवाला वाहिलेले असे. कसून काम करून सुध्दा सोन्याचा हंडा सापडला नाही बाबांना येवून सांगितले की हंडा सापडला नाही त्यावर ते म्हणत प्रयत्न चालू ठेव हंडा नक्की मिळेल सालोसाल प्रयत्न चालू होते हंडा सापडला नाही, परंतु एक फरक जाणवला शेतात धान्याचे पीक वाढू लागले क्रमाक्रमाने माझी भरभराट होत राहिली व मी आणखी शेते खरेदी केली आज मी लाखोपती आहे.

या प्रमाणे बाबांचे बोल खरे झाले आज मी फार सुखी आहे. मानवी प्रयत्न व परमेश्वरी कृपा यांचा संयोग झाला की उत्कर्षाची परमावधी होते. हे मला अनुभवाने पटले. श्रीसाईसत्चरित्रात म्हटल्या प्रमाणे तुम्ही जोर काढू लागा मी दूधाचे प्याले घेवून मागे उभाच आहे; परंतु तुम्ही जर जोर काढणार नसाल तर माझे कडून दूधाची अपेक्षा करू नका. बाबांना निष्क्रीयपणा आवडत नसे.

निरक्षर किंवा केवळ साक्षर याना सुध्दा श्रीबाबांनी पारमार्थिक गूढज्ञान अगदी सोप्या भाषेत समजावून देवून सर्वाभूती परमेश्वर हे सप्रमाण दाखविले आहे हे आपल्या श्रीसाईसत्चरित्रावरून आपणा सर्वांच्या लक्षात येईल. यथावकाश श्रींच्या प्रेरणेने श्रीसाईसत्चरित्रातील, काव्य रसाचा सुगंध आपण घेवू असे मी. श्रीसाईविश्व कुटुंबाचा एक घटक आपले मनोगत व्यक्त करतो.

# साईनाथ पुरवी मनोवासना

—श्री. सूर्यकांत मा. गर्जे
८० शिवाजीनगर पुणे–५

● दोन वर्षापूर्वीची घटना. श्री राजन नावाचा आंध्र प्रदेशातील एका खेड्यात राहणारा सुशिक्षित साईभक्त तरुण श्री बाबांच्या दर्शनासाठी शिरडीस आला होता. एक दोन दिवस मुक्काम केला. श्री बाबांचे दर्शन पुनः पुन्हा घेतले व शिर्डीचा निरोप घेऊन तो पुण्यास यावयास निघाला. पुण्याला यायची त्याची ही पहिलीच वेळ. पुण्याला शिवाजीनगर येथे श्री साईनाथ महाराजांचे मंदिर आहे आणि आपण ते पाहिले पाहिजे, तिथे जाऊन श्रीबाबांचे दर्शन घेतले पाहिजे या एकाच इच्छेपोटी तो पुण्याला आला होता.

सकाळी ११ च्या सुमारास गाडी पुणे स्टेशनवर आली. राजन खाली उतरला. शिवाजीनगरचा पत्ता खिशात होताच. एवढ्या मोठ्या शहरात तो शोधून काढणे थोडे कठीणच. त्यात सकाळपासून पोटात काही गेले नव्हते. प्रवासाचा शीण तर होताच त्यात भूक लागलेली त्यामुळे जीव व्याकूळ झाला होता. स्वाभाविक राजनची पावले हॉटेलच्या दिशेने वळली. दह्यामध्ये डुंबत असलेले वडे पाहून त्याच्या तोंडाला पाणी सुटले. परंतु काय झाले न कळे. त्याच्या मनात एकदम विचार आला, आपण बाबांच्या दर्शनासाठी इतक्या दूर आलो आहोत तेव्हा बाबांचे दर्शन न घेताच काही खाणे योग्य नव्हे. तो तडक उठला आणि हॉटेलबाहेर आला.

शिवाजीनगरचा पत्ता शोधत–शोधत अर्धा एक तासाच्या भ्रमंतीनंतर अखेर तो शिवाजीनगरच्या मंदिरात येऊन दाखल झाला. नुकतीच श्रीबाबांची आरती झालेली होती. श्री बाबांचे दर्शन घेऊन भक्त मंडळी घरी परतत होती. आमच्या मंदिरात नियमीत येणारे श्री. जोशी यांनी राजनला पाहिले. हातात प्रवासी बॅग असलेली ही व्यक्ती कोण ! असा प्रश्न स्वाभाविकपणे त्यांना पडला. श्री. जोशी यांनी जवळ जाऊन त्याची विचारपूस केली. इतक्या दूर अंतरावरून आपल्या मंदीरात श्रीबाबांच्या दर्शनासाठी आलेल्या राजनचा परिचय झाल्यावर त्यांना खूप आनंद झाला. त्यांनी राजनला आपले घरी नेले.

स्नान वगैरे आटोपल्यावर राजनला ताजेतवाने वाटू लागले. प्रवासाचा शीण दूर झाला होता. जेवणाची तयारी झाली. पानं वाढण्यात आली. हात धुवून श्री. जोशी

व राजन पाटावर बसले. श्री. जोशीनी एक घास तोंडात घेतला मात्र त्यांचे लक्ष राजनकडे गेले. राजनचे डोळे आसवांनी भरून आले होते. काय होत आहे हे न उमगून श्री. जोशी थोडे गडबडले. त्यांनी विचारले-' राजन, काही चुकले तर नाही ना आमचेकडून ?

राजनने डोळे पुसले. तो म्हणाला-'जोशी साहेब, सकाळी मी स्टेशनवर उतरलो तेव्हा तिथे दहिवडे खाण्याचा मला मोह झाला होता. परंतु श्रीबाबांचे दर्शन घेतल्याशिवाय काही खावू नये असा विचार करून दहिवडे न खाताच मी हॉटेल बाहेर पडलो होतो आणि आताही पानात ठेवलेली दहिवड्याची डिश पाहून मला आश्चर्याचा धक्काच बसला. श्री बाबांचे लक्ष भक्तावर किती असावे ! मी तिथे स्टेशन-वर दहिवडे खाल्ले नाहीत म्हणून बाबांनी मला इथे तुमच्या घरात दहिवडे खावयास दिले.'

राजनचा हा खुलासा ऐकून श्री. जोशी यांनाही आश्चर्य वाटले. वास्तविक श्री. जोशी यांच्या बहिणीने यापूर्वी कधीहि दहिवडे केले नव्हते. आजच करण्याची ही प्रेरणा तिला श्री बाबांकडूनच मिळाली असावी, यात संदेह नाही.

★

# साईबाबा व माधवनाथ महाराज

—श्री. बबन डी. येरम
बेस्ट अंडरटेकिंग इलेक्ट्रिक हाऊस
कमर्शिअल डिव्हिजन मुंबई ४०००३९

● भारत देश हा ऋषीमुनींचा देश आहे. उच्च अध्यात्मिक व नीतिची मूल्ये जोपासली गेली ती भारतातच श्रीसाईबाबांसारखे साक्षात्कारी महात्मे या भारत वर्षा-तच होऊन गेले ही आपल्या दृष्टीने परम भाग्याची गोष्ट होय. ज्यावेळी साईबाबा आपल्या अपार शक्तीने रंजल्या गांजल्याची सेवा करीत होते, त्याचवेळी मध्यप्रदेशात इंदूर येथे ब्र. श्रीमाधवनाथ महाराज आपले भक्तिकार्य प्रभावी पणे चालवित होते.

श्री माधवनाथ महाराजांचे चरित्र वाचताना श्रीसाईबाबांबद्दलचा अपार भक्ति-भाव, श्रद्धा प्रेम वरील चरित्रात दिसून आला. तो अद्भूत अनुभव येथे वर्णन करीत

आहे तो श्रीसाईलीलाच्या वाचकांस अमृतासमान वाटेल यात शंकाच नाही. ती घटना अशी—

श्रीनाथ महाराजांचे परमभक्त श्री. बाळासाहेब रेगे हे एकदा श्रीनाथांच्या दर्शनास गेले असताना महाराज म्हणाले, 'आपण पुणे मुक्कामी जाताना प्रथम शिर्डीस उतरावे व मगच पुढे जावे. मी ही, चिठी देतो तेव्हडी साईबाबांना पोचती करा.' या चिठीत देवीचे दर्शन इतकाच मजकूर लिहिला होता. श्रीनाथांची आज्ञा घेऊन बाळासाहेब शिर्डीस निघाले. मध्यरात्रीच्या सुमारास ते शिर्डीस पोहोचले सर्वत्र सामसूम होती. समाधीस्थानाची द्वार बंद होती. आता काय करावे हे न समजल्याने त्यांनी ती चिठी खिडकीच्या कठड्यावर ठेवली, व थोडा वेळ तेथेच उभे राहिले.

थोड्या वेळानंतर एक चमत्कृतीजन्य बदल तेथे घडला. आत समाधीच्या ठिकाणी मच्छरदाणी लावलेली असून डावे बाजूस स्वतः बाळासाहेब उभे असलेले दिसले व उजव्या बाजूस एक वाघ उभा असलेला दिसला. आपण स्वप्नात तर नाही ना असा संशय त्यांच्या मनी आला. परंतु आपण जागृतीत असल्याची खात्री करून ते पुढील दृश्य पाहू लागले. आता बाळासाहेबांच्या स्वतःच्या जागेवर देवीची मूर्ती दिसू लागली. हे पाहून त्यांना नाथांनी दिलेल्या चिठीचे स्मरण झाले व त्याचे गूढ स्पष्टपणे उकलले. अशा या अपूर्व दृश्यानंतर दुसरा चमत्कार त्यांच्या दृष्टीस दिसला. मच्छरदाणीत स्वतः साईबाबा बसलेले असून आपल्या नेहमीच्या पद्धतीने स्वानंदाने चिलीम पित असलेले दिसले, व समोर श्रीमाधवनाथ महाराज आपले आसनावर बसून मागेपुढे झुलत होते.

हा अद्भूत देखावा बराच काळ टिकला. या अतर्क्य घटनेने बाळासाहेब विस्मित झाले; परंतु साईबाबा व माधवनाथ महाराज यांच्या अगाध शक्तीचे, दोन संताच्या तादाम्य वृत्तीचे दर्शन त्यांना घडले. ती देवीची मूर्ती तो वाघ श्रीसाईबाबा व श्री माधवनाथ महाराज यांचे प्रत्यक्ष दर्शन घेण्याचे भाग्य श्री. रेगे यांना लाभले यातच त्यांची पूर्व पुण्याई दिसून येते.

आपण इतकेच म्हणूया —<br>
चराचरी जो भरला ।<br>
तो साईरुपे अवतरला ॥

टॅक्सी ड्रायव्हरला बुद्धी दिली व मदत करून ट्रक ड्रायव्हर हुडकून काढला. जर माझ्या भावाला जनरल हॉस्पिटलमध्ये नेले असते व ट्रक हुडकून काढता आला नसता तर झालेल्या घटनेचा पत्ता लागला नसता व काय झाले असते पण "जरी हे शरीर गेलो मी टाकून। तरी मी धावेन भक्तासाठी" ही बाबांची उक्ती किती सार्थ आहे पहा. !

# काय अजब ! हरवलेले जर्नल मिळाले !

—एक साईभक्त

● शिरडीचे श्री साईबाबा हे विसाव्या शतकातील एक महान संत होते. त्यांची प्रचिती अनेक साईभक्तांना पदोपदी येत आहे. मला पण श्रीसाईबाबांचे अनेक अनुभव आले आहेत.

श्रीसाईबाबा हे मोठ मोठी संकटे तर दूर करतातच पण त्याचबरोबर जर आपण त्यांना मनापासून हाक मारली तर ते तातडीने धावत येतात आणि आपल्याला संकटमुक्त करतात.

असाच एक चित्तथरारक अनुभव मला आला. काही दिवसापूर्वीच माझे कॉलेज मध्ये जर्नल ( प्रयोग वही ) हरवले. म्हणजे माझ्या मित्राला ते दिले होते आणि ते त्याच्या निष्काळजीपणामुळे हरवले. ती वेळ अशी होती की आठ दिवसावर माझी परिक्षा येऊन ठेपलेली आणि आज जर्नल हरवले आणि परत दुसरे जर्नल आणून ते लिहायचे म्हटले तरी त्याला सहा सात दिवस तरी लागणार होते आणि जर्नलशिवाय तर मी परिक्षासुद्धा देऊ शकत नव्हतो.

अशा अवस्थेत काय करावे हा प्रश्न पडला. दुसरा दिवस रविवारचा होता त्यामुळे कॉलेज बंद होते. अर्थात्च त्यामुळे काळजी आणखीच वाढली.

माझ्या मित्राच्या सांगण्यावरून त्याने जर्नल कॉलेजमध्येच कुठेतरी ठेवले होते. आता एवढ्या मोठ्या कॉलेजमध्ये माझे जर्नल शोधायचे म्हणजे चष्मा न लावता तांदळातील खडे वेचून काढण्यासारखेच आहे.

# प. पू. बाबांनी दिलेली संकटाची पूर्व सूचना

—सौ. उषा पंडीत,
शांतीनिवास, वाकोला ब्रिज,
सांताक्रूझ ( पूर्व ) मुं. ५४

● सालाबादप्रमाणे माझा साई सच्चरिताचा सप्ताह गुरुपौर्णिमेला पूर्ण झाला. थोड्याच दिवसांनी मला सूचक स्वप्न पडले. एक पत्र आले व त्यात ठळक शब्दात मजकूर होता. ' दक्षिणेकडून मोठे संकट येणार आहे पण भक्तांना मदत करण्यास साईबाबा समर्थ आहेत. ' सही होती माझे काका परमसाईभक्त डॉ. मधुसूदन बावरे यांची—

वरील स्वप्नानंतर चार पाच दिवसांनी माझी वीस वर्षाची तरूण पुतणी ( भारती ) हिचा सांताक्रूझ येथील हॉस्पिटलमधे अगदी अल्प आजाराने मृत्यू झाला. पण संकट दक्षिणेकडून येणार आहे असा इषारा होता म्हणून मी फार बेचैन झाले. स्वप्नाचा उलगडा थोड्याच दिवसांनी झाला तो असा.—

माझा धाकटा साईभक्त भाऊ ४५ वर्षाचा अरविंद चिंचणी तारापूर येथे रहात असे व रोज महाग सुवासिक उदबत्त्या बाबांपुढे लावीत असे. दसऱ्याची गर्दी कमी झाली की आपण शिर्डीला जाऊ असा बेत करीत होता. पण अकस्मात, संकट कोसळले. तो चक्कीचे दगड खरेदी करून नेण्याकरता चिंचणीहून मुंबईला ट्रकने आला. ट्रक भायखळा भाजी मार्केटमधे उभा राहिला व तो खरेदीसाठी निघून गेला. खरेदी आटोपून भाड्याच्या टॅक्सीने परत येत असताना जे. जे. हॉस्पिटलजवळ त्याला चक्कर आली. त्याने माझे काका दादरला डॉक्टर आहेत असे आधीच ड्रायव्हरला सांगितले होते म्हणून टॅक्सी भाजीमार्केटकडे आणली व चिंचणी—तारापूरहून कोणता ट्रक आला आहे तो हुडकून काढून त्याने पत्ता माहीत असलेल्या ट्रकवाल्याला बरोबर घेऊन दादरला डॉक्टर काकांकडे आणले. अवघ्या अर्धा तासात तो दादरला आला. माझा भाऊ औषध उपचाराबाहेर गेला होता.

वरील बातमी मी दुःखाने ऐकत असताना बाबाही दक्षिणेकडून संकट येत आहे त्या सूचनेची आठवण झाली. सांताक्रूझच्या दक्षिणेकडे जे. जे. हॉस्पिटल आहे व माझ्या काकांच्या सहीने पत्र आले होते त्यांच्याचकडे

मी सोमवारी सकाळी ' श्री साईनाथ स्तवन मंजिरी ' वाचताना श्री साईबाबांना सांगितले की बाबा, आज माझे जर्नल मिळू दे. मी मनापासून दररोज केलेले नमस्कार जर तुम्हाला पोहोचत असेल तर माझे जर्नल मला परत मिळवून द्या. '

अर्थात, जर्नल माझ्या मित्राच्या निष्काळजीपणामुळे हरवले असल्याने ते शोधून काढण्याची जबाबदारी मी श्रीसाईबाबांवर टाकू इच्छित नव्हतो पण जेव्हा एखादी गोष्ट माणसाच्या आवाक्याबाहेरचे असते तेव्हा त्याला अशा एखाद्या शक्तीची गरज लागते आणि त्याला त्या शक्तीची मदत घ्यावी लागते.

प्रत्येक माणसाच्या आयुष्यात अशा घटना घडतच असतात आणि त्या घटनेमुळे माणसाला परमेश्वराचा आधार घ्यावा लागतो.

सोमवारी कॉलेजमध्ये मी गेलो आणि कॉलेजच्या शिपायाला विचारले की शनिवारी कोणी जर्नल आणून दिले का ? त्याने तात्बडतोब माझेच ते जर्नल आणून माझ्या हातात दिले, आणि घरी येऊन मी श्रीसाईबाबांच्या फोटो समोर हात जोडून उभा राहिलो आणि त्याचक्षणी माझ्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले.

ते आनंदाश्रू होते. त्या परमेश्वराने खरोखरच माझ्यावर फार मोठी कृपा केली होती.

माझ्या काही मित्रांनी मला ह्या साईबाबांना मध्ये घातल्यामुळे वेड्यातच काढले होते.

पण प्रत्यक्षात काय घडले हे मलाच ठाऊक असल्याने मी काहीच बोलला नाही.

★

# भारतातील श्रीसाईबाबांची मंदिरे

( मागील अंकावरून क्रमशः )

[ असंख्य साईभक्तांनी केलेल्या मागणीमुळे मोठ्या कष्टाने व परिश्रमाने संग्रहीत केलेली ही सूची गत अंकापासून क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत. आमच्या असंख्य भक्तांना ही सूची नक्कीच संग्राह्य वाटेल. का. सं. ]

| | |
|---|---|
| २६) श्रीसाईनाम मंदिर | – मु. पो. उमरोळी, ता. पालघर, जि. ठाणे |
| २७) श्रीसाईबाबा मंदिर [श्रीनारायण बाबा] | – रेल्वे कॉलनी, पनवेल |
| २८) श्रीसाईबाबा मंदिर [श्रीनारायणबाबा] | – ए१/९०, सफदरजंग, एनक्लेव्ह, नवी दिल्ली ११००१६ |
| २९) श्रीसाईभक्त समाज [श्री. आर. एस. चिटणीस] | – १७ इनस्टीटयूशनल एरिया लोदी रोड, नवी दिल्ली ११०००३ |
| ३०) श्रीसाई समाज | – पी–११३ लेक टेरेस, बालीगंज, कलकत्ता–७०००२९ |
| ३१) हिमाद्री साईमंदिर | – ११ स्वीनहो स्ट्रीट ( अनिल मोईत्रा रोड ) कलकत्ता–१९ |
| ३२) श्रीसाईमंदिर | – फणसोप, जि. रत्नागिरी |
| ३३) श्रीसाई दरबार [ दादामहाराज माडीये ] | – कविलकट्टा, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग |
| ३४) श्रीसाईबाबा मंदिर [ श्रीसाईदास बाबूभाई मेहता ] | – मणिनगर स्टेशनजवळ, मु. पो. अमदाबाद ३८०००१ |
| ३५) श्रीसाईबाबा मंदिर | – शोभाराम सुरतीचा पोळ, बाला हनुमान खाडिया, अमदाबाद ३१०००१ |
| ३६) श्रीसाईबाबा सत्संग मंडळ [ श्री ठाकोरभाई पानवाला ] | – नानीहिंग पोळ, चौटाबाजार – मु. पो. सुरत |
| ३७) श्रीसाईबाबा मंदिर | – धंतोली, मु. पो. नागपूर |
| ३८) श्रीसाईनाथ मंदिर | – बळीराम पेठ, जळगाव ( सेंट्रल रेल्वे ) |
| ३९) श्री शिर्डी साईबाबा मंदिर | – बंडाफली, पंचेश्वर टॉवर, जामनगर, ( गुजराथ ) |
| ४०) श्रीसाईमंदिर | – वरदाफळी, मु. पो. जामनगर |
| ४१) श्रीसाईबाबा मंदिर | – रावपुरा, मु. पो. बडोदा |
| ४२) श्रीसाईबाबा नगर | – बडनेरा रोड, अमरावती |
| ४३) श्रीसाई वैभव कार्यालय | – विठ्ठल मंदिर रोड, वॉर्ड नं. ९ मु. पो. वर्धा, ( महाराष्ट्र राज्य ) |

—क्रमशः चालू

# प्रा. द. दि. परचुरे यांना श्रद्धांजली



ह्या मासिकाचे भूतपूर्व कार्यकारी संपादक प्रा. द. दि. परचुरे ह्यांना एक जून १९७३ ला हृदयविकाराचा झटका आला व त्यातच त्यांचा अंत झाला. प्रा. परचुरे सिद्धार्थ महाविद्यालयात गणित विषयाचे प्राध्यापक होते. त्या विषयाचे त्यांचे ज्ञान व तो विषय सोपा करून शिकविण्याची त्यांची हातोटी त्यांच्या शिष्यांच्या तसेच त्यांच्या सर्व समकालीन प्राध्यापकांच्या विशेष आदरास प्राप्त झाली होती, परंतु अध्यात्म आणि तत्वज्ञान ह्या विषयातही प्राध्यापक परचुरे यांना बराच रस होता व ह्या विषयांचेही त्यांचे वाचन बरेच चालत असे. आपल्या कीर्तनातून व प्रवचनातून ते साईभक्तीचा प्रचार सतत करीत असत. निधनाच्या आदल्याच दिवशी रात्री दि. ३१–५–७३ ला ते वरळी येथे प्रवचन करून आले होते आणि तो पर्यंत त्यांची प्रकृति छान होती.

साई बाबांचे चरित्र व त्यांची शिकवणूक ह्यांच्याशी त्यांचा परिचय झाल्यापासून ते त्यांच्याकडे इतके आकर्षित झाले होते की तेव्हा पासून साईभक्तीच्या प्रचारालाच त्यांनी आपले पुढील आयुष्य वाहिले होते. त्यांच्या वाङ्मयीन प्रवृत्तींचा परिचय भूतपूर्व रिसीव्हरसाहेब श्री. का. सी. पाठक ह्यांना झाला. त्यावेळी त्यांनी प्रा. परचुरे ह्यांना श्रीसाईलीला मासिकाच्या संपादकत्वाची जबाबदारी स्वीकारण्याची विनंती केली व साईबाबांच्यावरील भक्तीमुळे प्रा. परचुरे ह्यांनी ती तात्काळ स्वीकारली. साईलीला मासिकाच्या तत्कालीन स्वरूपाकडे पहातांना प्रा. परचुरे ह्यांच्या ही गोष्ट तात्काळ लक्षात आली की त्यात प्रसिद्ध होणारे तीन भाषांतील लेख हे काही भाषिकांवर अन्याय करणारे आहेत. तेव्हां ह्या मासिकाचे हे स्वरुप बदलून त्याच्या दोन स्वतंत्र आवृत्या (एक हिंदी व इंग्रजी व दुसरी संपूर्ण मराठी) काढण्याची कल्पना त्यांना सुचली व त्यावेळचे रिसिव्हरसाहेब श्री पाठक ह्यांनी ती उचलून धरली आणि अशा प्रकारे एक एप्रिल १९७३ पासून साईलीला मासिकाच्या दोन स्वतंत्र आवृत्त्या निघू लागल्या. त्यावेळी साईलीला मासिकाचा प्रसार फारच थोडा असल्यामुळे १–४–१९७३ ला मराठी आवृत्तीच्या ८०० आणि इंग्रजी अंकाच्या फक्त ४०० प्रति छापल्या जात असत आणि मासिकाची पाने ४८ असत. १–४–८० पासून ही पृष्ठसंख्या वाढली असून सध्या साईलीला मासिक ६४ पानाचे निघते हे वाचकांना माहितच आहे.

श्रीसाईबाबांच्या कृपेने साई महिमा लोकांना अधिकाधिक पटू लागला आहे आणि त्याचमुळे साईभक्तीचा प्रसारही झपाट्याने होत आहे. त्याचबरोबर साईलीला मासिकाचे ग्राहकही मोठ्या प्रमाणावर वाढत आहेत. सध्या साईलीला मासिकाच्या मराठी आवृत्तीच्या ४००० प्रती व इंग्रजी आवृत्तीच्या २००० प्रति निघतात. साई-लीला मासिकाच्या दोन निराळ्या आवृत्या काढण्याची सुरवात झाल्यानंतर प्रा. परचुरे ह्यांना एप्रिल, मे व जून १९७३ एवढ्या तीनच आवृत्या पहावयास मिळाल्या. आजची मासिकाची झालेली प्रगति पाहून त्यांना निश्चितच आनंद वाटला असता व आपण लावलेल्या वृक्षाला ही गोड फळे आलेली पाहून धन्यताच वाटली असती; परंतु हे व्हावयाचे नव्हते.

श्रीसाईलीला मासिकाचे बाह्यस्वरूप व त्याचा दर्जा सुधारण्यासाठी प्रा. परचुरे ह्यांनी जे अविश्रांत श्रम केले त्याबद्दल त्यांच्या नवव्या श्राद्ध दिनी (दि. १–६–१९८२) त्यांना आम्ही कृतज्ञता पूर्वक श्रद्धांजली वहातो.

संपादक


## श्रीसाईलीला
## भव्य दिवाळी अंक १९८२
# भक्त अनुभव विशेषांक

**१ नव्हेंबर १९८२ रोजी थाटात प्रसिद्ध होणार**

साईभक्तांनी बाबांच्या विषयी आलेले आपले ताजे अनुभव अगदी थोडक्यात कागदाच्या एकाच बाजूने लिहून पाठवावेत. आपले अनुभव १५ जुलै १९८२ पर्यंतच आमचे हाती यावेत. त्यानंतर आलेल्या अनुभव मजकूरांचा स्वीकार करता येणार नाही.

सर्व मजकूर संपादक श्रीसाईलीला, साईनिकेतन ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०० ०१४ येथेच पाठवावा.

मुखपृष्ठावर भगवान श्रीसाईनाथांचे बहारदार चित्र

**किंमत २ रु.)** (पृष्ठे १२८

# सद्‌गुरू साईसमर्थांचे स्तवनगीत सप्तक

(प्रकृतिं परमां या चालीवर)

शिर्डी पुण्यग्रामी प्रगटले गुरू।
निंब वृक्षातळी दिसती सद्गुरू।
मशिदीत धुनी ज्ञानाग्नीची असे।
साईनाथ प्रभु हेचि बोलिलेसे ॥ १ ॥
मशिदीत माझ्या एकवार आला।
हिशोबा करूनी सांभाळीन त्याला।
दरबार माझा सर्वांसाठी खुला।
सर्व माय बाप साईनाथ मौला ॥ २ ॥
मंत्र थोर त्यांचा निष्ठा सबुरीचा।
नित्य ध्यानी धरी अल्ला मालिक त्याचा।
आश्वासन देती गुरूराज ऐसे।
भक्तिप्रेम सोने आज अर्पितसे ॥ ३ ॥
भाषणे संदिग्धि खुणा जाणविती।
प्रेमभरे भक्त पुलकीत होती।
अघटित शक्ति सामर्थ्य साईंचे।
अचिन्त्य स्वरूपा वानू कैसे वाचे ॥ ४ ॥
उपासनी गुरू ताटधारी महा।
सर्वस्वा अर्पिती साईनाथ पहा।
सुवर्णाच्या पत्री लिहुनीया देती।
उपासनी साई एकरूप होती ॥ ५ ॥
बालके अज्ञानी आम्हा छत्र त्यांचे।
जन्मोजन्मी लाभो फळ सुकृताचे।
उपासनी गुरू गोदावरी माय।
साई समर्थांचे सत्य रूप होय ॥ ६ ॥
निंबवृक्ष झाला कल्पतरू भला।
जळामाजि दीप साईंनी लाविला।
जवळी अंतरी व्यापुनीया राही।
गुरूनाथ साई कृपादृष्टि पाही ३ ॥ ७ ॥

—क. कु. माहेश्वरी गुरू गोदावरी माताजी

श्री. श्री उपासनी कन्याकुमारी स्थान, साकोरी

# तुजसाठी साई

तुजसाठी साई गुलाबपुष्प मी होईन रे ।
पायदळी चिरडून तुझ्या धन्य मी होईन रे ॥ १ ॥

तुजसाठी साई भ्रमर मी होईन रे ।
भावगीतानी कानात तुझ्या हितगुज मी करीन रे ॥ २ ॥

तुजसाठी साई सरीता मी होईन रे ।
स्नानास तुझ्या काव्याकुळ्यांतूनी वाहत मी येईन रे ॥ ३ ॥

तुजसाठी साई तरुवर होवून छाया मी देईन रे ।
सुकले तरी धुनिमाईत जळून उदीरूपे मी राहीन रे ॥ ४ ॥

तुजसाठी साई दीपज्योत मी होईन रे ।
जळता जळता प्रकाश देवून तृप्त मी होईन रे ॥ ५ ॥

तुजसाठी साई फुलपाखरू मी होईन रे ।
फुलाफुलातील जमवुनी मद्य मुखी तुझ्या घालीन रे ॥ ६ ॥

तुजसाठी साई अगरबत्ती मी होईन रे ।
जळता जळता सुगंध तुज मी देईन रे ॥ ७ ॥

तुजसाठी साई पवन मी होईन रे ।
निरोप तुझा भक्तांना त्वरीत मी देईन रे ॥ ८ ॥

तुजसाठी साई चंदन मी होईन रे ।
झिजता झिजता ही शशी तुझ्याच चरणी लीन होईल रे ॥ ९ ॥

—सौ. शशिकला रा. रेवणकर
कुंटोली अंबरनाथ

# साईलीलेची महती

रामनवमीच्या या शुभसमयाला ।
साठीची झाली साईलीला ।
सूर्य चंद्र जंवया अवनीवरती ।
राहील साईलीलेची महती ॥

—सौ. प्राची अ. शहाणे
लक्ष्मी निवास गडकरी पथ
डोंबिवली पूर्व जि. ठाणे

✫

# काव्यातून शुभसंदेश

नेत्री न पाहिले साईनाथ
परि रात्रंदिन, साईचा तो ध्यास,
नसूनी देहाने या जगतात
दाविती भक्तां लीला, श्रीसाईनाथ
'साईलीला' वाचुनी मन तृप्त होई
साईभाऊली बघण्यासाठी मन धाव घेई,
साठ वर्षे पूर्ण होती 'साईलीलेला'
दृष्ट नको लागू दे माझ्या 'साईलीलेला'
एक ना एक दिन मी, हा इहलोक सोडणार
परि यावदचंद्रदिवाकरौ 'साईलीला' होऊदे अमर

—निलम शाम देसाई
१/५ मानव कल्याण सोसायटी
बांगूर नगर, गोरेगाव (पश्चिम)

# साईनाथ दर्शन

भक्त मंदिरी तो आला, साई दर्शनाला
नवविधा भक्ती माला, तुला पूजण्याला ॥ धृ० ॥

हृदय संपुटीची पुष्पे, वाहु तुला भक्ती
नेत्रदीप नीरांजने, उजळुया वाती
जोडून कर ठेवुन माथा, पदी नम्र झाला ॥ १ ॥

काम क्रोध षट्‌रिपु यांचे, हवन करोनी
भस्म तेचि लावी अंगा, त्रिपुटी भरोनी
मागणे न काही मागे, तुझ्या चरणाला ॥ २ ॥

एक आस मनी मी धरली, साई दर्शनाची
झडकरी याहो बाबा, भेट द्या मलाची
विष्णु कवी व्याकूळ झाला, तुम्हा पहाण्याला ॥ ३ ॥

—श्री. वि. बा. तानवडे (शिवदास)
श्री सिद्धेश्वर कुरोली, जि. सातारा

## श्रीसाईलीला

**येत्या विजयादशमीचा अंक**

**खास बाल साहित्य विशेषांक**

आमच्या छोट्या वाचक बंधू-भगिनींनी आपापले बाबांच्या विषयीचे लेख, कवितां, अनुभव किंवा शिरडी, मी बाबांची भक्ती कशी करतो, साईबाबांबद्दल आपणास काय वाटते इ. विषयक लेख १ ऑगष्ट १९८२ पूर्वीच संपादक साईलीला साईनिकेतन ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर मुंबई ४०० ०१४ येथे पाठवावेत. लेख पाठविणाऱ्या मुला-मुलींची वयोमर्यादा १६ वर्षा पर्यंत. लेख कागदाच्या एकाच बाजूने लिहून पाठवावेत.

# बाबांचा संदेश

भूतदया हा मार्ग असे संत महंताचा
म्हणुनी बाबा दाविती भक्ता मार्ग पुण्याचा

घरोघरी मागितलेली पवित्र ती भिक्षा
वाटप बाबा करी तिचे आधी पशुपक्षा

मशिदीत बाबा करी उपदेश भक्तात
एकत्र आत्मा असे वसत सर्व जीवांत

म्हणून भक्तहो भूतदया अंगी बाणावी
प्रयत्न करूनी पिडींताची दुःखे हरावी

जीवन असे जगण्यासाठी भक्ति भावाने
श्रद्धा, सबुरी, सदाचार, परोपकाराने

हाच संदेश देत बाबा लोक कल्याणार्थ
करा बंधुनो त्याचे पालन स्व उद्धारार्थ

—श्री. कृ. भा. देशमुख
२८३ शुक्रवार पेठ, पालकर वाडा
फडगेटा समोर, पुणे २

रामनवमीचे उत्सवाचे वेळी मुंबईहून आलेल्या काही कलाकारांनी आपल्या कलाकुसरीच्या रुपाने बाबांपुढे हजेरी लावली. समाधिमंदीराचे वरील हॉलमध्ये रांगोळी प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्याचीं दृश्ये खालीं देत आहोत. सदर कलाकारांना बाबांचे आशिर्वाद.





## रांगोळी प्रदर्शन!





रांगोळी प्रदर्शन!

साईभक्तांना अमूल्य नजराणा

साईबाबांचे सानिध्यात असलेले सध्याचे एकमेव

श्री स्वामी साई शरणानंद लिखित

अमूल्य ग्रंथ

# ' श्री साईबाबा '

शिरडीच्या साईबाबांचे ऐतिहासिक चरीत्र

| | |
|---|---|
| मूळ किंमत<br>रु. ६०/- | सवलतीची किंमत<br>४५/- फक्त |

सवलत ३१ जून १९८२ पर्यंत


: प्रकाशक :

दिनपुष्प प्रकाशन

कृष्णा १२/बी,

डॉ. भालेराव मार्ग,

गिरगांव मुं. नं. ४००००४

# शिरडी वृत्त माहे एप्रिल १९८२

## रामनवमी उत्सव कार्यक्रम

श्री सच्चिदानंद सद्‌गुरु साईनाथ महाराज यांचा श्रीरामनवमी उत्सव सालाबादप्रमाणे गुरुवार दि. १-४-८२ ते शनिवार दि. ३-४-८२ पर्यंत तीन दिवस थाटात साजरा झाला. दिवसेंदिवस श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी भक्तांची गर्दी जास्त प्रमाणात वाढत असल्यामुळे उत्सवात कोणत्याही प्रकारे गैरसोय होऊ नये म्हणून संस्थानचे रिसिव्हर मा. श्री. क. हि. काकरे साहेब यांनी उत्सवाचे तयारीसाठी सर्व खातेप्रमुखांची सभा एक महिना अगोदर घेऊन सर्व कामांचा व खर्चाचा विचारविनिमय करून कामाची योजना आखून दिल्याप्रमाणे मांडवाचे काम, पाणपोई, संरक्षण, साफसफाई, दिवाबत्ती, लाऊडस्पीकर, कलाकारांची हजेरी, सनई, चौघडा, वाजंत्री, अन्नदान वगैरेची व्यवस्था ठेवण्यात आली होती.

**उत्सवाचा पहिला दिवसः-** गुरुवार दि. १-४-८२ रोजी नित्य कार्यक्रमाव्यतिरीक्त सकाळी ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक गुरुस्थानमार्गे श्रींच्या द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी श्रींच्या फोटोची स्थापना चांदीच्या भव्य सिंहासनावर झाल्यावर 'साईसच्चरित' अध्याय वाचनास सुरुवात झाली. दुपारी ४.३० ते सायंकाळी ६.३० पर्यंत श्री. निळू भाऊ (ह. भ. प. अनंतराव आठवले महाराज यांचे शिष्य) जि. नांदेड यांचे कीर्तन झाले. रात्रौ ७.३० ते ११ वाजेपर्यंत रेडिओ स्टार पंडित जितेंद्र अभिषेकी यांचे गायन झाले. रात्रौ ९-१५ ते ११-३० पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून काढणेत आली. मिरवणुकीचे वेळी स्थानिक लोकांनी व भक्त मंडळीनी गारुडभारुड कार्यक्रम केले. पुण्याचे रघुनाथ सांडभोर यांनी नकलांचे कार्यक्रम केले. त्यानंतर वाद्यांचे गजरात श्रींची पालखी समाधीमंदिरात आली व शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवसः-** शुक्रवार दि. २-४-८२ रोजी उत्सवाचा मुख्य दिवस असल्यामुळे पहाटे पासूनच श्रींच्या दर्शनासाठी भक्तांच्या रांगा लागल्या होत्या. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी ६ वा. श्रींच्या फोटोची व साईचरित्र ग्रंथ वाचन समाप्ती मिरवणूक द्वारकामाईतून मंदिरात आली. त्यानंतर कावडी मिरवणुकीचा मोठा कार्यक्रम झाला. शिरडी गावातील भाविक मंडळी व बाहेरगावाहून आलेले साईभक्त कोपरगाव मुक्कामी रात्री जाऊन गोदावरी नदीचे पाणी घेऊन ९ मैल पायी चालत आले. सकाळी ६-३० वा. मा. श्री. काकरेसाहेब यांनी कावडीची पूजा केल्यावर अंदाजे एक हजार कावडींची भव्य मिरवणूक वाजत गाजत गावातून आली. मंदिराजवळ मिरवणूक आल्यावर सुवासिनींनी कावडीस ओवाळले, नंतर प्रत्येकाने कावडीच्या पाण्याने बाबांच्या समाधीस स्नान घातले. हा कार्यक्रम दोन तास चालला होता.

सकाळी १०–३० ते १२–३० पर्यंत ह. भ. प. शेखर अनंतराव आठवले महाराज नांदेड यांचे रामजन्म आख्यान कीर्तन झाले. सायंकाळी ४ वाजता श्रींच्या निशाणाची व ५ वाजता रथाची मिरवणूक गावातून निघाली. रात्रौ ८–३० वाजता 'शिरडी दर्शन' फिल्म व 'मानस सरोवर दर्शन' फिल्म दाखवणेत आली. रात्रौ १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत उपस्थित कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेऱ्या दिल्या. रात्रभर जागर झाला. मंदिर साईभक्ताना दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवले होते.

**उत्सवाचा तिसरा दिवस**—शनिवार दि. ३-४-८२ नित्यकार्यक्रम व्यतिरीक्त ह. भ. प. शेखर अनंतराव आठवले महाराज यांचे गोपाळकाला कीर्तन सकाळी १०–३० ते १२–३० पर्यंत झाले. दहीहंडी माध्यान्ह आरती झाल्यावर तीर्थप्रसाद वाटण्यात आला. रात्रौ ७–३० ते १० पर्यंत रेडिओस्टार श्री. प्रभाकर कारेकर मुंबई यांचे गायनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर शेजारती होऊन उत्सव समाप्त झाला.

काही कलाकारांनी श्रींच्यापुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे–

**कीर्तन :** १) एकादशी व महत्वाचे दिवशी संस्थानतर्फे कीर्तने झाली. २) श्री. निळूभाऊ, नांदेड ३) ह. भ. प. शेखर अनंतराव आठवले महाराज, नांदेड ४) ह. भ. प. गजाननबुवा, मु. पो कुंभेफळ, जि. बुलढाणा ५) ह. भ. प. सौ. गुलाबबाई महाडीक, इंदोर.

**प्रवचन :** १) ह. भ. प. जाधव गुरुजी, शिर्डी २) ह. भ. प. जगन्नानबुवा वाघचौरे शिर्डी.

**गायन, वादन, नृत्य, भजन वगैरे :** १) श्री. श्रीराम व्ही. सातर्डेकर, मुं. २) डॉ. श्री. किर्तीकर, मुं. ३) पंडित जितेंद्र अभिषेकी, मुं. ४) श्री. रमाकांत म्हापसेकर, मुं. ५) श्री. सुहास महाजन, मुं. ६) श्री. राजा काळे, मुं. ७) श्री. रमेश सुखटणकर, मुं. ८) श्री. अरुण आपटे, मुं. ९) श्री. रघुनाथ फडके, मुं. १०) श्री. रामदास दत्तात्रय दैठणकर, ११) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई. १२) श्री. शिवराम बाबुराव बिडवे, १३) श्री. नारायण तुकाराम तुपे, पुणे. १४) सौ. विमल बी. पुरोहीत, शिर्डी. १५) श्री. रावसाहेब देशमुख, उमरावती. १६) डॉ. आय. रामचंद्र, हैद्राबाद. १७) श्री. शशीकांत दत्तात्रय जोशी, राहाता. १८) श्री. दिगंबर बबन भातवडेकर, राहाता. १९) श्री. शामराव बबन भोसले, रत्नागिरी. २०) श्री. रामचंद्र श्रीराम होमकर, रत्नागिरी. २१) स्वामी साईदास द्वारा गावकरी, २२) श्री. बाळासाहेब गोखले, खोपोली. २३) सौ. शरयू साईदास मराठे, २४) सौ. शकुंतला जोशी, २५) प्रोफेसर काने, कोळपेवाडी. २६) श्री. हारकचंद चंद्रभान, आलेगाव. २७) श्री. नंदकिशोर पुरोहीत, बडोदा. २८) पार्वतीबाई मुंडे, बार्शी. २९) शकुंतळाबाई जाधव, सुंभ. ३०) श्री. भगवान नारायण सर्जे,

सावळविहीर. ३१) श्री. श्यामसुंदर थेडा, संगमनेर. ३२) श्री. वसंता बाईकर, ढवळपूरीकर तमाशा मंडळ पुणे. ३३) विठाबाई कुळाळकर, पुणे. ३४) श्री. रंगा कऱ्हाडकर, पुणे. ३५) श्री. छबू ढवळपूरीकर, पुणे. ३६) श्री. मैत्रान कोंडीबा लाम्णे, पुणे. ३७) श्री. निवृत्ती कुरणकर, पुणे. ३८) श्री. बाबुराव तुकाराम कांबळे, ढवळपूरी. ३९) श्री. दत्तोबा पवार मराठवाडीकर, ढवळपूरी. ४०) श्री. प्रभाकर भालचंद्र अवचट, श्रीरामपूर. ४१) श्री. शिवाजी पांढरे शिवडकर. ४२) श्री. कारभारी जाधव, ढवळपूर. ४३) श्री. ज्ञानेश्वर रामचंद्र वैद्य, शिर्डी. ४४) श्री. अहमदखान गुलामखान पठाण, शिर्डी. ४५) श्री. पमाजी पंचराम, ४६) श्री. दौलत शर्मा, मुंबई. ४७) श्री. वसंतराव वासुंदेकर, खेडकर तमाशा मंडळ, नारायणगाव. ४८) श्री. ज्ञानोबा तात्या वाडेकर, शिर्डी. ४९) श्री. शेख नबाब उमरपठाण, अस्तगाव. ५०) श्री. कुलदीप सिंग, नाशिक. ५१) श्री. विलास पाटील, कोल्हापूर. ५२) लिलावती गुजराथी, शिर्डी. ५३) श्री. मधुकर गायकवाड, कोल्हापूर. ५४) श्री. चंद्रसेन पवार, कोल्हापूर. ५५) अन्नपूर्णा देवी, शिर्डी. ५६) एन. मनी शिर्डी. ५७) श्री. आदिनाथ तुकारा भूइगळ, सावळविहीर. ५८) श्री. विजय पवार, सावळविहीर. ५९) गेणथाक आंबेठाणकर, ढवळपूरी. ६०) श्री. बाळासाहेब कुलकर्णी, सावळविहीर. ६१) श्री. ज्ञानेश्वर नामदेव काळोस, ढवळपूरी. ६२) श्री. जादूसिंग. ठाकूर, खेडकर. ६३) श्री. भगवान तोताराम खंडागळे, ढवळपूरी. ६४) श्री. उत्तम नारायण सगर, ढवळपूरी. ६५) श्री. ललीतकुमार जोशी, शिर्डी. ६६) श्री. शंकरराव उपासनी, हरेगाव. ६७) नौशेर हरानी शिर्डी. ६८) श्री. रामदास भाऊसाहेब ठाकूर, खेडकर. ६९) श्री. भीमराज धोंडीराम बनसोडे, साकुरी. ७०) श्री. दत्तात्रय काशीनाथ कोतकर, सटाना. ७१) श्री वसंत दामोदर रासने, पुणे. ७२) श्री. सुधीर जोशी, श्रीरामपूर. ७३) श्री. नटवर चुडामण विसपुते, शिर्डी. ७४) श्री. साईदास मराठे, शिर्डी. ७५) श्री. नाना कोरोट, शिर्डी. ७६) श्री. श्रीकृष्ण गुप्ता, इंदोर. ७७) ह. भ. प. तुकाराम बुवा आजेगावकर परभणी. ७८) ह. भ. प. दामोदर वासुदेव भंडारकवठे, पंढरपूर. ७९) कै. तुकाराम खेडकर सह पांडुरंग मुळे मांजरवाडीकर लोकनाट्य मंडळ (केंद्र नारायणगाव) ८०) श्री. प्रभाकर कारेकर, मुंबई. ८१) श्री. राजाभाऊ कोसडे, मुंबई. ८२) श्री. मंगेश मुळे, मुंबई. ८३) श्री. मडकईकर मुंबई. ८४) श्री. मोदगी श्रीनिवास विनायक मुंबई. ८५) श्री. रघुनाथ बाबुराव सांडभोर, पुणे. ८६) श्री. वसंत मोरेश्वर पवार, पुणे. ८७) श्री. रघुनाथ नागरे, शिर्डी. ८८) श्री. चतुर्धन नागरे, शिर्डी. ८९) श्री. बारावकर काका शिर्डी. ९०) श्री. माणिक साळी, शिर्डी. ९१) श्री. शांताराम मिराणे, शिर्डी. ९२) श्री. विलास पावसकर, मुंबई. ९३) श्री. वसंतराव जोशी, मुंबई. ९४) यशवंत नाईक, मुंबई. ९५) श्री. दत्ताराम कदम, मुंबई. ९६) श्री. गोविंद कदम

मुं. ९७) श्री. हरीभाऊ वारंगे, मुं. ९८) श्री. शशीकांत सखणकर, मुं. ९९) श्री. सुरेश लांजेकर, मुं. १००) श्री. घोगरे पाटील, मुं. १०१) श्री. जयवंत विलणकर, मुं. १०२) श्री. अनंत बाबुराव, मुं. १०३) श्री. सुरेश हिर्लेकर, १०४) श्री. सुहास पवार मुं. १०५) श्री. मारुती मांडवकर, मुं. १०६) श्री. शशीकांत दळवी, मुं. १०७) श्री. राजन सातघरे, मुं. १०८) श्री. विलास महाडीक, मुं. १०९) श्री. नरेंद्र विचारे, मुं. ११०) श्री. अभय मोरे, मुं. १११) श्री. विलास परळकर, मुं. ११२) कु. विमल भाऊसाहेब शिर्के, जळगाव. ११३) सौ. सुभामती म. वळाम, मुं. ११४) श्री. य. श. शहाणे, इंदौर. ११५) श्रीमती रोशनबी सुरती, जबलपूर. ११६) शोभना मनोहर जावळे, मुं. ११७) श्रीमती पुष्पा अनंत शिंत्रे, मुं. ११८) श्री. माधव गजानन केळकर, पाली. ११९) सौ. पुष्पा ओसवाल, मुं. १२०) श्री. एस. एन. बनजीसी, राऊरकेला. १२१) सौ. शशीकला सदाशिव कुलकर्णी, डोंबिवली. १२२) सौ. भाग्यश्री दत्तात्रय गोगटे, औरंगाबाद १२३) श्री. विनोद पंढरीनाथ कुलकर्णी, औरंगाबाद. १२४) श्री. दत्तात्रय माणिकराव गोगटे, औरंगाबाद. १२५) श्री. श्यामसुंदर, शिकंदराबाद.

श्री रामनवमी उत्सवात प्रा. नरेंद्र विचारे जे जे स्कूल ऑफ आर्टस मुंबई व श्री. विलास महाडीक मुंबई यांनी श्रीबाबांचे जीवनावर काढलेल्या रांगोळयाचे प्रदर्शन भरविले होते.

**कै. भाऊ महाराज कुंभार पुण्यतिथी** :– सालाबाद प्रमाणे चैत्र वद्य ॥ १२ ॥ बुधवार दि. २१–४–८२ रोजी साईभक्त संत कै. भाऊमहाराज कुंभार यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. दुपारी माध्यान्ह आली नंतर भाऊ महाराज यांचे फोटोची मिरवणूक समाधी मंदिरातून त्यांचे लेंडी बागेजवळील समाधी पर्यंत गेली. तेथे समाधीला स्नान घालून पूजा आरती करणेत आली. व सर्वांना प्रसाद वाटणेत आला.

**हवा पाणी** :– शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराइ काही नाही.

## श्री गुरुपौर्णिमा उत्सव

या वर्षी **गुरुपौर्णिमा उत्सव** सोमवार दिनांक ५–७–८२ ते बुधवार दिनांक ७–७–८२ पर्यंत ३ दिवस होणार आहे. मुख्य दिवस **मंगळवार दिनांक** ६–७–८२ हा आहे.